www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ सुशासन सप्ताह" अंतर्गत जिल्हाधिकारी...

पान ३ वर....



■ पालकमंत्रीपदासाठी ओढाताण; जिल्ह्या -जिल्ह्यांत...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २०० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### रेल्वे आणि फलाटाच्या पोकळीत सापडलेल्या प्रवाशाला आरपीएफच्या कर्मचाऱ्यांकडून जीवदान

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकात रेल्वे आणि फलाटाच्या पोकळीत सापडलेल्या एका प्रवाशाला रेल्वे सुरक्षा दलामुळे (आरपीएफ) जीवदान मिळाले आहे. आरपीएफच्या या कार्याविषयी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले जात आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आमची पॅशन – जितेंद्र आव्हाड



**ठाणे :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे ज्या पक्षात आहेत, त्यांच्या मातृसंस्थेने संविधानाला विरोध केला होता. आता शहांच्या विधानाने भाजपच्या मनात काय आहे, ते उघडकीस आले आहे, अशी टीका राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांनी सोमवारी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आमची पॅशन आहे, असेही ते म्हणाले.

# कांदिवलीच्या कामगार विमा योजना हॉस्पिटलचा कायापालट होणार, पीयूष गोयल यांचा विश्वास



● मुंबई, यश सावंत :

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल कांदिवली (पूर्व) येथील कामगार विमा योजना हॉस्पिटलला भेट दिली. या भेटीदरम्यान, त्यांनी रुग्णालयातील सुविधांवर आणि भविष्यात होणाऱ्या विस्तारावर अधिकाऱ्यांशी तसेच डॉक्टरांशी सखोल चर्चा केली. ५०० बेड असलेले हे रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यरत होईल आणि याचे स्वरूप बदलले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.केंद्र आणि महाराष्ट्रातील योग्य कर्मचार्यांना राज्य कामगार विमा योजनेचा लाभ मिळतो. भविष्यात या योजनेचा विस्तार होईल आणि आयुष्यमान भारत योजनेतील पात्र लाभार्थ्यांनाही येथे उपचार मिळू शकतील, याबाबत केंद्र आणि राज्य सरकार एकत्र काम करणार असल्याचे केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी सांगितले. यावेळी उत्तर मुंबई भाजपाध्यक्ष गणेश खणकर, भाजपाचे आप्पा बेलवलकर, बाबा सिंह, निखिल व्यास यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'अजित पवार यांना, भुजबळांना राष्ट्रीय स्तरावर पाठवायचे होते'

● पुणे, सुचिता सोनवणे:



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात न घेता डावलले नाही. अजित पवार यांच्या मते त्यांना राष्ट्रीय स्तरावर पाठवायचे आहे. मात्र, भुजबळ यांच्या मनात वेगळे होते. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला असून आम्ही तिन्ही पक्षांचे नेते बसून त्यावर योग्य तो तोडगा काढू, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पुण्यात एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलत होते. भुजबळ यांच्याशी याबाबत चर्चा झाली आहे. त्यात त्यांना सर्व बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. ते आमच्या महायुतीचे प्रमुख नेते आहेत. ते राष्ट्रवादीचे असल्याने तेथे त्यांचा सन्मान आहेच.

पान २ वर

## धनंजय मुंडेंना मंत्रीमंडळाबाहेर काढून मस्साजोग प्रकरणाची चौकशी करा: नाना पटोले

● नांदेड, दिगंबर जाधव:

वाल्मिक कराड हा माफीया आहे. मस्साजोग प्रकरणात सत्ताधारी पक्षातील आमदारांनी देखील सत्य परिस्थिती सांगितली होती. पण मुख्यमंत्र्यांनी टाईमपास केला. माफीयाला ताकद देण्याचे काम केले. त्यामुळे धनंजय मुंडे यांना मंत्रीमंडळातून बाहेर काढून या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

नाना पटोले हे सोमवारी नांदेड विमानतळावर आले होते. यावेळी पटोले म्हणाले, अजित पवारांवर ज्यावेळी आरोप झाले. त्यावेळी त्यांनाही मंत्री मंडळातून बाहेर काढण्यात आले होते. आता मुख्यमंत्री आणि अजित पवारांनी धनंजय मुंडेंना मंत्री मंडळातून बाहेर काढून चौकशी केल्यास मयत संतोष देशमुखांना न्याय मिळेल. असे पटोले म्हणाले. तसेच छगन भूजबळ हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला जाऊ शकतात.

पान २ वर

### ... तर नरेंद्र मोदी यांचे अपयश

धारावी अदानीच्या घशात घातले. दोन दिवसापूर्वी तसा जीआर निघाला. अदानी, भाजपाचे नेते आणि निवडणुक आयोग हे ठरलेलं आहे. उद्योगपतींच्या माध्यमातून हे राज्य चालविलं जात आहे. फडणवीसांनी भारत जोडो यात्रेत नक्षल संघटना होत्या असा आरोप केला होता. तेव्हा मी त्यांना पत्र पाठवून कुठल्या नक्षल यंत्रणा त्यात सहभागी होत्या याची यादी मागितली होती. तुम्ही गृहमंत्री होता, केंद्रात तुमचे सरकार आहे. मग हे नरेंद्र मोदी यांचे अपयश आहे असे त्यांना सांगायचे आहे काय? असा सवालही पटोले यांनी केला



## अटकपूर्व जामिनासाठीची याचिका फेटाळत दिल्ली हायकोर्टाकडून पूजा खेडकरला मोठा धक्का

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

बरखास्त ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकरला दिल्ली हायकोर्टाने आज मोठा धक्का दिला आहे. ट्रायल कोर्टाच्या निर्णयाविरोधात पूजा खेडकर हिने दाखल केलेली याचिका हायकोर्टाने फेटाळून लावली आहे. ट्राल कोर्टाने पूजा खेडकर हिला अटकपूर्व जामीन देण्याचा नकार दिला होता. त्यानंतर पूजा खेडकर हिने या निर्णयाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेत आव्हान दिले होते. मात्र ही याचिका फेटाळण्यात आल्याने आता पूजा खेडकर हिच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. तसेच तिला कुठल्याही क्षणी अटक होऊ शकते.



पूजा खेकर हिला ऑगस्ट महिन्यात अटकेपासून संरक्षण मिळालं होतं. मात्र आता दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे तिच्यासमोरील अडचणीत वाढ झाली आहे. आज झालेल्या सुनावणीत कोर्टाने सांगितले की, याचिकाकर्त्याचं आचरण हे समाजातील वंचित समुहांसाठीच्या योजनांचा लाभ घेण्याच्या उद्देशाने प्रेरित आहे. मात्र त्या वंचित समुहांसाठीच्या तरतुदींचा लाभ घेण्यास पात्र नसल्याचे तपासामधून दिसून येत आहे.

पान २ वर

## पोलिसांनी सूर्यवंशीची हत्या केली आणि मुख्यमंत्री विधानसभेत खोटं बोलले - राहुल गांधींचा गंभीर आरोप

● परभणी, सचिन कदम :



परभणी येथील हिंसाचारानंतर पोलीस कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी तरुणाचा मृत्यू झाला. त्याच्या कुटुंबीयांची विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी (२३ डिसेंबर) भेट घेतली आणि सांत्वन केले. "सोमनाथ सूर्यवंशी हा संविधानाचे रक्षण करीत होता. तो दलित असल्याने पोलिसांनी त्याची हत्या केली. याबद्दल मुख्यमंत्र्यांनी खोटे निवेदन विधानसभेत दिले", असा आरोप राहुल गांधी यांनी केला. संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यामुळे पुकारलेल्या परभणी बंददरम्यान हिंसाचार झाला. यामध्ये सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. सूर्यवंशी कुटुंबियांची भेट घेण्यासाठी खासदार राहल गांधी हे परभणीत आले होते. यावेळी त्यांच्यासमवेत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथल्ला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, आ. विजय वडेट्टीवार, आ. अमित देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, खा. संजय जाधव, माजी आ. सुरेश वरपूडकर, सिद्धार्थ हत्तिअंबिरे भगवान वाघमारे यांच्यासह राज्यातून आलेले अनेक नेते उपस्थित होते.

पान २ वर

## नागपूर महानगरपालिका पुन्हा एकदा सक्रिय, एका आठवड्यात १,०४८ बेकायदेशीर होर्डिंग्ज हटवले

● नागपूर, नितीन देवळेकर :




महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन शनिवारी संपताच, नागपूर महानगरपालिका पुन्हा एकदा सक्रिय झाली आणि रविवारी शहरात बेकायदेशीर होर्डिंग्जविरुद्ध कारवाईला वेग दिला. महापालिकेने असा दावा केला की ते बेकायदेशीर होर्डिंग्जवर सातत्याने कारवाई करत आहेत आणि गेल्या सात दिवसांत १,०४८ बेकायदेशीर होर्डिंग्ज हटवले आहेत. तथापि, शहराच्या विविध भागात अजूनही अनेक बेकायदेशीर होर्डिंग्ज आहेत. गेल्या काही आठवड्यात, विधानसभा निवडणुकीच्या प्रचार, विधानसभा निवडणुकीचा निकाल, राजकीय उमेदवारांच्या विजयी रॅली आणि नुकत्याच संपलेल्या हिवाळी अधिवेशनासह अनेक राजकीय कार्यक्रमांमुळे शहरात बेकायदेशीर राजकीय होर्डिंग्ज मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. उच्च न्यायालयाच्या कडक निर्देशांनंतरही बेकायदेशीर राजकीय होर्डिंग्जविरुद्ध कारवाई करण्यात अपयशी ठरल्याबद्दल अनेक नागरिकांनी एनएमसीवर टीका केली होती.

पान २ वर

## केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा मोठा निर्णय, नो डिटेंशन पॉलिसी आली संपुष्टात

● ठाणे, सम्यक कासारे :




शिक्षण क्षेत्रात अनेकदा टीकेला सामोरे झालेलं पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचं धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अखेर रद्द केलं आहे. नो डिटेंशन पॉलिसी आता संपुष्टात आणण्यात आली आहे, ज्यामुळे पाचवी ते आठवीतील वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुतीर्ण ठरवले जाईल. या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देण्याची संधी दिली जाईल, पण पुन्हा नापास झाल्यास पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. तथापि, इयत्ता आठवीपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून बाहेर काढता येणार नाही. सोमवारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दीर्घकाळापासून लागू असलेली व्यवस्था बदलत नो डिटेंशन पॉलिसी समाप्त केली. यामुळे आता पाचवी ते आठवीतील वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुतीर्ण ठरवले जाईल. सरकारने या निर्णयाचे मुख्य उद्दिष्ट मुलांची शिकण्याची क्षमता सुधारणा आणि शैक्षणिक कामगिरी वाढवण्याचे सांगितले आहे. नवीन धोरणानुसार, अनुतीर्ण विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळेल.

पान २ वर

## राज्यात ढगाळ वातावरणामुळे पावसाचा अंदाज, थंडीत घट

● पुणे, अभिजित येरल्लू :



राज्यामध्ये दोन दिवसांपासून थंडीत घट झाली असून, पावसाला पोषक हवामान तयार झाले आहे. सोमवारी आणि मंगळवारी राज्यामधील काही भागात अंशतः ढगाळ हवामान राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. पुण्यातही दुपारपासून ढगाळ वातावरण पहायला मिळत आहे. राज्याच्या किमान तापमानात चढ-उतार होण्याची शक्यता आहे.

सध्या पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात ठळक कमी दाब क्षेत्र सक्रिय आहे. ही प्रणाली मंगळवारपर्यंत (दि.२४) उत्तर तमिळनाडू, दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याकडे येण्याची शक्यता आहे. देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाकाही कमी - अधिक होत आहे.

राज्यामध्ये सोमवारी (दि.२३) मंगळवारी आणि बुधवारी काही भागात ढगाळ वातावरणाचा अंदाज आहे. तसेच तापमानात चढ उतार राहणार आहे. गुरुवारी पालघर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, अहिल्यानगर, पुणे, जालना, परभणी, बीड या जिल्ह्यांमध्ये काही भागात ढगाळ हवामान राहणार असून, हलक्या पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, नंदूरबार, धुळे या जिल्ह्यांमध्ये काही भागात वादळी वारे आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. तर शुक्रवारी (दि.२७) पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, अकोला, अमरावती, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह हलक्या ते मध्यम पावसाचा यलो अलर्ट आहे. तर धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्या त काही ठिकाणी ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

सध्याच्या वातावरणीय घडामोडी पाहता शुक्रवार दि. २७ डिसेंबरला संपूर्ण मध्य महाराष्ट्र व मराठवाडा तसेच विदर्भातील काही जिल्ह्यात असे एकूण २५ जिल्ह्यांत तूरळक ठिकाणी किरकोळ गारपीटीची शक्यता जाणवते.

### गारपीटीची शक्यता कशामुळे वाढली?

■ सध्याच्या २६ डिसेंबर दरम्यान देशात प्रवेशलेले प्रखर पश्चिम प्रकोपाच्या प्रेरित परिणामातून व राजस्थानच्या आग्नेयला दीड ते दोन किमी. उंचीपर्यंतच्या पातळीतील थंड कोरडे चक्रीय वाऱ्यांची स्थिती आहे. तर ८०० मीटर उंचीपर्यंतच्या खालच्या पातळीतील अरबी समुद्रातून नैरुत्त्य दिशेकडून वारे येत असून, बं. उपसागरातून पूर्वे दिशेकडून येणारे आर्द्रतायुक्त वारे अश्या तीन वाऱ्यांच्या टक्करीतून घनीभवन होवून गारपीट होण्याची शक्यता निर्माण होत आहे, असे माणिकराव खुळे यांनी सांगितले.

## अमित शाह, नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस हे राज ठाकरेंचे आयडॉल : संजय राऊत

● मुंबई, विशाल कारंडे :



राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर अनेक चर्चा सुरू आहेत. ही चर्चा माझ्यासारख्या कार्यकर्त्यांमध्ये देखील आहे. कारण मी राज ठाकरे यांच्यासोबत जवळून काम केले आहे. त्यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबाशी माझं जवळचं नातं राहिले आहे. माझ्या पक्षाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे हेही माझ्या अतिशय जवळचे आणि मोठ्या भावाप्रमाणे आहेत. दरम्यान काल दोघे भाऊ एकत्र आले त्याचा निश्चित महाराष्ट्राला आनंद झाला आहे. ठाकरे कुटुंबावर महाराष्ट्राच्या जनतेचे प्रेम आहे.

जनतेचे दोन्ही भावंडांवर जीवापाड प्रेम आहे. त्याच दृष्टीने मराठी माणूस त्यांच्याकडे बघत असतो. दोघांचे पक्ष वेगळे आहेत. त्यांच्यात वैचारिक मतभेद आहेत. कुटुंब म्हणुन मात्र आम्ही कायम एक आहोत. मात्र राज ठाकरे यांचे अमित शाह, नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस हे ऑइडॉल आहेत. आमच्या पक्षाचे तसें नाही. महाराष्ट्रावर अन्याय करणारे, आमचा पक्ष फोडणारे हे लोक आहेत. त्यामुळं आम्ही त्यांच्यासोबत जाऊ शकतं नसल्याचे म्हणत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर भाष्य केलंय.

पान २ वर

## संपादकीय

# भारतीय संविधानातील भारतीयतेचा प्रश्न !

संसदेच्या दोन्ही सभागृहांत 'संविधान' या विषयावर चर्चा होत असताना, हल्ली अनेकदा विचारला जाणारा एक प्रश्न मात्र टाळला गेला. 'भारतीय संविधानात भारतीय काय आहे ?' हा तो प्रश्न. तो विरोधी पक्षीयांनी विचारला नाहीच, पण सत्ताधाऱ्यांनीही टाळला. लोकसभा निवडणुकीत भाजपचे हात पोळल्यामुळे आता इतक्यातच हा प्रश्न काढायला नको, असा भाजपने संसदेतल्या चर्चेत संविधानाचे गोडवेच गाण्याचे ठरवून संविधानावर टीका करण्याचे वा त्याबाबत शंकाकुशंका उपस्थित करण्याचे काम संसदेबाहेरच्या अनुयायांवर किंवा 'समविचारी लोकांवर सोडून दिले आणि मग पंतप्रधानांना 'संविधानाचा तारणहार जर कुणी असेल तर तो मीच' या छापाची नाट्यछटा छानपैकी सादर करता आली. 'भारतीय संविधानात भारतीय काय आहे?' हा प्रश्न हाताळणे वा त्याचे समर्पक उत्तर देणे कदाचित विरोधी पक्षीयांनाही कठीण वाटत असावे आणि म्हणून त्यांनीही तो सोडूनच दिला असावा. राहुल गांधी यांनी सावरकरांचा उल्लेख केला तेव्हा खरे तर हा प्रश्नसुद्धा आपसूकच उपस्थित होऊ शकला असता, पण तसे झालेले नाही. अर्थात, संविधानाबद्दलची असली तरी हीदेखील चर्चा एकंदरीत नेहमीसारखीच राजकीय उणीदुणी काढण्यात समाधान मानणारी ठरली.

तरीही तो प्रश्न उरतोच. भाजपचे हल्ली उफाळून आलेले संविधानप्रेम दिसतेच आहे, पण दुसरीकडे संविधानविरोधी वक्तव्ये आणि कृती यांना अभय देण्याचा उद्योगही सुखेनैव सुरू आहे. संविधान आपलेच आहे की नाही असे खडसावून विचारण्याची वेळ आता आलेली आहे. छुप्या वा उघड संविधानविरोधकांच्या भात्यातला 'भारतीयत्वा'चा बाण आधी निष्प्रभ करणे हा संविधान मानणाऱ्यांचा वैचारिक मार्ग असायला हवा. त्यासाठी मुळात, संविधानाच्या भारतीयत्वाचा प्रश्न हा गांभीर्यानेही विचारला जाऊ शकतो, हे मान्य करायला हवे. एकतर हे संविधान इंग्रजीत म्हणजे युरोपीय वसाहतकारांच्याच भाषेत लिहिले गेले, शिवाय लिखित संविधानाचा आग्रह हादेखील आधुनिकतावादी काळातल्या संविधानवादातून आलेला आहे. अगदी संविधानसभेतही संविधान आकार घेत असतानाच ते 'परके' किंवा 'परदेशी' नाही का ठरणार, असा प्रश्न उपस्थित केला गेलेला होता. दुसरे एक पथ्य संविधान मानणाऱ्यांनी पाळायला हवे ते म्हणजे, आपण तेवढे उदारमतवादी आणि हा प्रश्न विचारणारे संकुचित, दुराग्रही वगैरे असे समजण्याचे काही कारण नाही. त्यामुळे, पण भारतीय संविधान भारतीयच कशाला असायला हवे?' यासारखा प्रतिप्रश्न निरर्थक ठरतो. प्रत्येक राज्यघटनेमध्ये आपापल्या संदर्भात काहीएक सांस्कृतिक सत्त्व असायला हवे, ही अपेक्षा रास्त आहेच. पण त्याहीपेक्षा, असा प्रतिप्रश्न विचारल्याने 'म्हणजे संविधानात भारतीय काहीच नाही' यासारखा अपसमज दृढ होण्याची (किंवा मुद्दाम केला जाण्याची शक्यता वाढते. आपल्या संविधानकर्त्यांना जुनाट रूढिपरंपराग्रस्त भारताला मागे सोडून, नव्या समर्थ भारतीय समाज उभारणीचा पाया म्हणून संविधानाची रचना करायची होती. परंतु या वास्तवाकडे डोळेझाक करायची आणि आपल्या संविधानकर्त्यांना भारतीयत्वाशी काही देणेघेणेच नव्हते असा प्रचार करायचा, ही प्रवृत्ती सध्या दिसते आहेच. पण वास्तव जसे कुणी नाकारू नये, तसेच वर्तमानही नाकारू नये. त्यामुळेच संविधानाचे भारतीयत्व याविषयीच्या प्रश्नाला भिडण्याची सुरुवात स्वच्छपणे करावी लागेल, त्यासाठी भारतीयत्व म्हणजे काय नाही, याचाही विचार दोन्ही बाजूंनी जरूर करून पाहावा. भारतीय संविधान भारतीयच हवे म्हणून जे 'परकीय' ते ते अस्पृश्यच मानायचे, असे जर केले गेले असते तर आधुनिक राज्ययंत्रणेची संकल्पनासुद्धा आपल्या संविधानाला दूरच ठेवावी लागली असती. इतक्या टोकाचा विचार केला असता तर, 'भारतीय संविधान' हा विरोधाभासच ठरला असता. दुसरे म्हणजे, प्राचीन भारतीय प्रतिमांचे संदर्भ घेऊन संविधानाची पाने सजवली, म्हणून काही संविधान भारतीय ठरत नाही; जसे इंडियन पीनल कोडला 'भारतीय न्याय व्यवहारी हिशेब भाजपने केला असणे शक्य आहे. संहिता' असे नाव दिल्याने आतला मजकूर वा शिक्षेचे प्रकार बदलत नाहीत, तसेच हे तिसरा मुद्दा म्हणजे संविधानात व्यवच्छेदकरीत्या प्राचीन भारतीय ठरणाऱ्या कोणत्याही संकल्पनेला सांविधानिक तरतुदींपेक्षा जास्त महत्त्व देण्यात आलेले नाही. 'संविधानात भारतीयत्व हवे असे आज म्हणणाऱ्यांची खरी मागणी संविधानात 'हिंदुत्व हवे (किंवा 'सनातन धर्मा'ला अनुसरून संविधानाची धारणा हवी) अशीच जर असेल, तर असल्या राज्यघटनेचे सामाजिक परिणाम किती भीषण होतील यावर वाद घालत न बसता अधिक महत्त्वाचा मुद्दा मांडला पाहिजे. तो असा की, एका धर्माला वा एका संस्कृतीलाच प्राधान्य हवे, अशा कडव्या आग्रहाला संविधानाचा आधार देण्याचा प्रकार हा संकल्पनेच्या पातळीवर निश्चितपणे 'अनुकरणवादी' ठरतो. १९३० सालच्या जर्मन राज्यघटनेने तसेच दक्षिण आशियात पाकिस्तानी राज्यघटनेने जे केले किंवा इस्रायलने ज्या प्रकारच्या राज्ययंत्रणेला घटनात्मक आधार दिला तेच आपण करायला हवे होते किंवा यापुढे केले पाहिजे असे ज्यांना वाटते आहे त्यांना अनुकरणवादी किंवा नक्कलखोरच म्हटले पाहिजे. त्याऐवजी जर गांभीर्याने भारतीयत्वाचा विचार करायचा तर दोन मार्ग दिसतात. एक म्हणजे 'पाश्चात्त्य' मानला जाणारा आधुनिक राज्ययंत्रणेचा विचार पूर्णतः बाजूला ठेवून इथल्या मातीला आणि माणसांना, इथल्या खेड्यापाड्यांना महत्त्व देणारा विचार, जो गांधीजींनी 'हिंद स्वराज' मध्ये मांडला होता. ग्रामस्वराज्य आणि स्वदेशी या संकल्पनांवर अख्ख्या राष्ट्राची वाटचाल आधारित असावी, असे गांधीजींनी १९०९ साली प्रकाशित झालेल्या या छोटेखानी पुस्तिकावजा ग्रंथात सुचवले होते. त्या संकल्पनांवर विश्वास ठेवणारे श्रीमन नारायण अग्रवाल यांनी गांधीवादी राज्यघटना (१९४६) प्रस्तावित केली होती, कारण त्यांच्या मते संविधान सभेत त्या वेळी आकार घेणारी राज्यघटना ही भारतीय जीवनशैलीला न्याय देणारी नव्हती.

# साने गुरुजी



आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळयाच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार ,पुणे**

# प्रशासनाला पत्र देऊन देखील फडके मैदान लग्न कार्यासाठी दिल्याने मैदानात कचऱ्याचे साम्राज्य

## कल्याणातील फडके मैदान लग्न, जत्रा यासाठी न देण्याची मोहन उगले यांनी केली होती आयुक्तांकडे मागणी

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पश्चिमेतील वासुदेव बळवंत फडके मैदान या खेळाच्या मैदानात कोणत्याही लग्न, जत्रा यांना परवानगी देऊ नये अशी मागणी माजी नगरसेवक, शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी पत्राद्वारे केडीएमसी आयुक्तांकडे केली होती. मात्र या मागणीनंतर देखील केडीएमसी प्रशासनाने फडके मैदान लग्नकार्यासाठी दिल्याने ही लग्नकार्य झाल्यानंतर मात्र मैदानात कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याने मैदानात येणाऱ्या खेळाडुंनी आणि फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती उगले यांनी दिली. कल्याण डोंबिवली मनपाच्या फडके मैदानात लग्न, इतर समारंभ साजरे करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. या ठिकाणी बगीचा देखील असून त्या अनुषंगाने सकाळ संध्याकाळ क्रिडाप्रेमी नागरिक, जेष्ठ नागरिक, लहान मुले मैदानात खेळाचा आनंद घेत असतात. परंतू त्या ठिकाणी लग्न, जत्रा ,इतर कार्यक्रम करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. आजूबाजूच्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास होतो. यासर्व गोष्टींचा विचार करता हे मैदान कोणालाही भाड्याने देऊ नये अशा आशायाचे पत्र शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त यांना दिले होते. असे असतांना देखील रविवारी हे मैदान लग्नकार्यासाठी देण्यात आले.

## पान १ वरून...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस...

तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या मनातही त्यांच्याविषयी सन्मानाची भावना आहेच. महायुतीच्या विजयात त्यांचा वाटा राहिलेला आहे, अशी स्पष्टोक्ती फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले, अजित पवारही त्यांची चिंता करतात. अजित पवार यांनी त्यांना जेव्हा मंत्रिमंडळात घेतले नाही, तेव्हा त्यांचा भुजबळ यांना डावलण्याचा कोणताही हेतू नव्हता. याबाबत मी अजित पवार यांच्याशी बोललो. ते म्हणाले की आमचा पक्ष राष्ट्रीय पक्ष राहिलेला आहे. पक्षाला राष्ट्रीय स्तरावर मोठा करायचे आहे. भुजबळ यांना राष्ट्रीय स्तरावर मोठी मान्यता आहे. त्यांना आम्हाला राष्ट्रीय स्तरावर पाठवायचे आहे. मात्र, भुजबळ यांच्या मनात वेगळे होते. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर तिन्ही पक्षांचे नेते बसून तोडगा काढू."

पालकमंत्रिपदाबाबत मंत्रिमंडळात कोणतेही स्पर्धा नसल्याचे स्पष्ट करून तिन्ही पक्षांच्या नेत्यांना याबाबत जबाबदारी दिली आहे. हे नेते एकत्र बसतील. येत्या दोन तीन दिवसांत त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता येत्या सात ते आठ दिवसांत वितरित करण्यात येईल असेही ते म्हणाले.

परभणी प्रकरणात मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी कोठडीतील मृत्यूप्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरले आहे. त्याबाबत फडणवीस म्हणाले, राहुल गांधी यांनी केवळ राजकीय हेतूने ही भेट घेतली आहे. लोकांमध्ये, जातीजातींमध्ये द्वेष पसरविण्याचे काम ते करत आहेत. राज्य सरकार संवेदनशील असल्याने या प्रकरणी न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. यातून सर्व सत्य व तथ्य बाहेर येईल, त्यात काहीही लपविण्याचे नाही. चौकशीत कुठल्याही प्रकारे तसेच मारहाणीत हा मृत्यू झाल्याचे आढळल्यास कुणालाही सोडले जाणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. शरद पवार यांनीही मला यात लक्ष घालण्यास सांगितले असून त्यांना मी यात पूर्ण लक्ष घातले असल्याचे सांगितले आहे."

बीड येथील प्रकरणानंतर मराठा क्रांती मोर्चाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रत्येक कार्यक्रमात निदर्शने करण्याचा इशारा दिला आहे, त्याबाबत फडणवीस यांनी असे करणे चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले. या प्रकरणाचीही चौकशी सुरू असून त्यामध्ये कोणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले.

नवी दिल्लीत प्रजासत्ताकदिनी होणाऱ्या सोहळ्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाला यंदा संधी देण्यात आलेली नाही. सर्व राज्यांना आलटून पालटून संधी देण्यात येते. त्या दिवशी रस्त्यावर केवळ १५ रथांना परवानगी दिली जाते. मात्र, यंदा अन्य रथांचा नव्याने समावेश करायचा असल्यास तशी विनंती करू, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### धनंजय मुंडेंना मंत्रीमंडळाबाहेर...

त्यावर मी काय बोलणार? त्यांच्या नाराजीबद्दल मला माहिती नाही. मंत्री पदाचे वाटप झाल्यानंतर आता पालकमंत्री पदासाठी रस्सीखेच आहे. कारण हे लोकातून निवडून आलेले सरकार नाही. निवडणुक आयोग आणि भाजपाच्या सिंडीकेट मधून आलेले सरकार आहे. त्यामुळे लोकांना त्यांना काही देणे-घेणे नाही. लोकांना कसे लुटता येईल, मलाईदार खाते, मालदार जिल्हे कसे मिळतील यावर सगळा जोर सुरु आहे.

### अटकपूर्व जामिनासाठीची...

आलिशान वाहनांचे मालक असण्याबरोबरच याचिकाकर्त्यांचे आई-वडील प्रभावशाली आहेत, असं निरीक्षणही कोर्टाने नोंदवलं. असं वाटतं की, पूजा खेडकर हिने उचलेली पावलं ही व्यवस्थेत फेरफार करण्याच्या एका मोठ्या कटाचा भाग होती. लाखो विद्यार्थी यूपीएसएसी परीक्षेसाठी उपस्थित असतात. या परिस्थितीत तिच्याकडून वापरण्यात आलेली रणनीती अनेक प्रश्न उपस्थित करते. फसवणुकीचं हे उदाहरण केवळ घटनात्मक संस्थाच नाही तर संपूर्ण समाजाची फसवणूक करणारे आहे, असे निरीक्षण दिल्ली हायकोर्टाने नोंदवले.

दरम्यान, या प्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी चौकशीची आवश्यकत आहे. तसेच याचिकाकर्त्याविरोधात एक भक्कम खटला उभार राहू शकतो, त्यामुळे ही याचिका फेटाळण्यात येत आहे, असे सांगत कोर्टाने पूजा खेडकर हिची याचिका फेटाळून लावली. पूजा खेडकर हिच्यावर फसवणूक करून यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा तसेच ओबीसी आणि दिव्यांग कोट्याचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचा आरोप आहे.

### पोलिसांनी सूर्यवंशीची हत्या...

गांधी यांनी तब्बल २० ते २५ मिनिटे या सूर्यवंशी कुटुंबियांशी चर्चा केली. पोलिसांनी हत्या केली -राहुल गांधीयावेळी माध्यमांशी बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, "मी सूर्यवंशींच्या कुटुंबीयांना भेटलोय. ज्या लोकांना मारहाण झाली, त्यांनाही भेटलो. त्यांनी (सोमनाथ सूर्यवंशी यांचे कुटुंबीय) पोस्टमॉर्टम रिपोर्ट दाखविला. व्हिडीओ दाखवला. छायाचित्रे दाखविले."

"ही ९९ टक्के नाही, तर शंभर टक्के कोठडीत झालेला मृत्यू आहे. पोलिसांनी त्यांची हत्या केली आहे आणि मुख्यमंत्री पोलिसांना मेसेज देण्यासाठी विधानसभेत खोटं बोलले", असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला.

दलित असल्याने हत्या -गांधी

"या तरुणाला यामुळे मारण्यात आलं, कारण तो दलित होता. आणि तो संविधानाचे तो रक्षण करीत होता. आरएसएसची विचारधारा ही संविधान नष्ट करण्याची विचारधारा आहे. याची चौकशी करावी, यात संबंधितांना शिक्षा व्हावी, अशी आमची मागणी आहे, असेही राहुल गांधी म्हणाले.

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर खासदार गांधी म्हणाले, "हा कोणताही राजकारण करण्याचा विषय नाही. हा न्याय मिळवून देण्याचा विषय आहे. याला संघाची विचारधारा जबाबदार आहे. यावर मुख्यमंत्र्यांनी खोटे निवेदन दिले, त्यामुळे याला मुख्यमंत्रीही जबाबदार आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

### नागपूर महानगरपालिका पुन्हा...

"दरवर्षी असे घडते; मनपा त्यांच्या राजकीय नेत्यांना त्यांचा राजकीय कार्यक्रम संपेपर्यंत बेकायदेशीर होर्डिंग्ज तसेच राहू देऊन सुटका करून देते. यावेळीही तेच घडले. सिव्हिल लाईन्स परिसर हा प्रमुख रस्त्यांवर, आमदार वसतिगृहाजवळ आणि इतर प्रमुख ठिकाणी, अगदी मनपा कार्यालयाजवळही बेकायदेशीर होर्डिंग्जने भरलेला होता. परंतु मनपा त्याकडे दुर्लक्ष करत होती आणि आता, हिवाळी विधानसभा संपली आहे आणि प्रत्येक निवडून आलेला प्रतिनिधी घरी परतला आहे, त्यामुळे मनपा बेकायदेशीर होर्डिंग्ज हटवण्यास सुरुवात केली आहे," असे सिव्हिल लाईन्समधील एका रहिवाशाने सांगितले.

केवळ सिव्हिल लाईन्सच नाही तर शहरात, विशेषतः वर्धा रोड आणि इतर प्रमुख भागात बेकायदेशीर होर्डिंग्ज वाढले होते. तथापि, मनपाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की हिवाळी अधिवेशनात बेकायदेशीर होर्डिंग्जविरुद्धची त्यांची मोहीम सुरूच राहिली. "१५ डिसेंबरपासून, आम्ही मनपाच्या सर्व १० झोनमध्ये १,०४८ बेकायदेशीर होर्डिंग्ज हटवले आहेत," असे अधिकाऱ्याने सांगितले.

या महिन्याच्या सुरुवातीला, कामठी रोड उड्डाणपुलावर दुचाकी चालवणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकावर बेकायदेशीर होर्डिंग्ज पडल्या. या घटनेनंतर ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाला आणि त्याला एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनादरम्यान सिव्हिल लाईन्स हा सर्वात जास्त प्रभावित भागांपैकी एक होता, कारण नागरिक केवळ बेकायदेशीर होर्डिंग्जमुळेच नव्हे तर व्हीआयपी हालचालींमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने निराश झाले होते. हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर, सिव्हिल लाईन्स तसेच शहराच्या इतर भागांमधील अनेक रहिवासी व्हीआयपी हालचालींमुळे होणारी वाहतूक कोंडी अखेर संपेल अशी आशा बाळगत आहेत.

"पुढील वर्षी, सिव्हिल लाईन्स परिसरातील सामान्य जीवनावर व्हीआयपी हालचालींमुळे परिणाम होणार नाही याची खात्री करण्यासाठी महापालिका, पोलिस विभाग आणि जिल्हा प्रशासनाने अतिरिक्त खबरदारी घ्यावी. काही योजना आधीच बनवल्या पाहिजेत आणि त्या योग्यरित्या अंमलात आणल्या पाहिजेत," असे सिव्हिल लाईन्सच्या एका रहिवाशाने सांगितले.

### केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा मोठा...

पण जर त्या परीक्षेतही ते नापास झाले, तर पुढच्या इयत्तेत त्यांचा प्रवेश होणार नाही. सरकारने असेही स्पष्ट केले आहे की इयत्ता आठवीपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढता येणार नाही.

शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी सांगितले की, मुलांमधील शिकण्याच्या क्षमतेतील घट थांबवण्यासाठी हे पाऊल आवश्यक होते. मंत्रालयाने विशेषतः पाचवी आणि आठवीवरील लक्ष केंद्रित केले आहे, कारण या दोन्ही इयत्तांचा पायाभूत शिक्षणासाठी महत्त्व आहे. या नव्या धोरणाने विद्यार्थी आणि शिक्षकांना अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### अमित शाह, नरेंद्र मोदी, देवेंद्र...

दोन भाऊ काल एकत्र आले त्याचा नक्कीच आनंद, मात्र....

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे मुंबईत काल (22डिसेंबर) एकत्र आल्याचं पाहायला मिळाले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या भाच्याचं लग्न होतं. या लग्न सोहळ्यानिमित्त राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंसह संपूर्ण कुटुंब एकत्र पाहायला मिळाले. यावेळी आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, रश्मी ठाकरे देखील उपस्थित होते. मुंबईतील दादरमधील राजे शिवाजी विद्यालयात लग्नाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी लग्नाला राज ठाकरेंसह उद्धव ठाकरे सहकुटुंब उपस्थित राहिले. लग्नात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र पाहायला मिळाले. तसेच दोघांमध्ये काही संवाद देखील झाला.

नुकतीच राज ठाकरेंनी रश्मी ठाकरेंच्या भाच्याच्या लग्नाला हजेरी लावली होती. दरम्यान या भेटीवरुन राज्याच्या राजकारणात अनेक प्रतिक्रिया उमटतांना बघायला मिळाल्या आहेत. राज ठाकरे आमच्यासाठी वेगळे नाहीत. मात्र मोदी, शाह हे महाराष्ट्राचे शत्रु आहेत. राज ठाकरे दुर्दैवाने अशा लोकांची साथ देतात. त्यामुळे आमचे मतभेद. मात्र कुटुंब एकच असतं. अजित पवार शरद पवार एकत्र येऊन भेटतात. रोहित पवारही काकांना येऊन भेटतात. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेट ही एक कौटुंबीक भेट असल्याची प्रतिक्रिया ही खासदार संजय राऊत यांनी दिली आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याण डोंबिवली पालिकेतील ३४३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**कल्याण (विवेक गुंजाळ)** – कल्याण डोंबिवली पालिकेतील आस्थापना सूचीवरील वर्ग एक ते वर्ग चार संवर्गातील ३४३ कर्मचाऱ्यांना सर्व रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नत्ती देण्याचा निर्णय विभागीय पदोन्नती समितीने घेतला. या समितीच्या निर्णयानुसार आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी ३४३ कर्मचाऱ्यांच्या विविध विभागातील पदोन्नतीचा आदेश शुक्रवारी जाहीर केला.

मागील अनेक वर्षापासून विविध विभागातील कर्मचारी या पदोन्नतीच्या प्रतीक्षेत होते. या पदोन्नतीची वाट पाहत अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले. या पदोन्नती देताना समितीने कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, न्यायालयीन प्रकरणे, सेवाज्येष्ठता, अनुभव या सर्व बाबींचा विचार केला. पालिकेतील पात्र, अनुभवी सर्व विभागातील वर्ग एक ते वर्ग चार संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळावी म्हणून म्युनसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाळ हरदास, कार्याध्यक्ष अजय पवार, सरचिटणीस सचिन बासरे, उपाध्यक्ष सुनील पवार, सुरेश तेलवणे, प्रभुनाथ भोईर, तात्या माने, खजिनदार पल्लवी सुपे यांनी पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. आयुक्तांबरोबर वेळोवेळी बैठका घेऊन या पदोन्नतीचा




निर्णय घेण्याची मागणी केली होती. पदोन्नत्या मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. मागील पंधरा वर्षापासून पालिकेच्या सचिव कार्यालयात लिपिक, तेथेच वरिष्ठ लिपिक अशा पदोन्नती घेऊन उपसचिव असलेले किशोर शेळके यांना सचिव पदी पदोन्नती देण्यात आली आहे. ते उच्चशिक्षित आहेत. अधीक्षक पदावरील नऊ जण, वरिष्ठ लिपिक संवर्गातील ६३, लिपिक टंकलेखक संवर्गातील ५९, शिपाई संवर्ग सात, वरिष्ठ सुरक्षा रक्षक पाच, लेखापाल १२, उपअभियंता १८, पर्यवेक्षक नऊ, तारतंत्री सहा, उपअग्निशमन अधिकारी आठ, परिचारिका प्रमुख सहा, स्वच्छता निरीक्षक २५, मुकादम ९४, थिएटर ॲटेंडन्ट १५ अशा एकूण ३४३ कर्मचाऱ्यांना पालिकेने पदोन्नत्ती दिली आहे.

या पदोन्नत्ती सामान्य प्रशासन विभागाच्या मे २०२१ च्या पत्राच्या निर्देशानुसार सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आल्या आहेत. या तात्पुरत्या पदोन्नतीने संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नती पदाच्या ज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत, असे आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पदोन्नती आदेशात म्हटले आहे. या पदोन्नत्त्या रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवला आहे. न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी, गुन्हे दाखल कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव सीलबंद लिफाफ्यात बंदिस्त ठेवण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या विषयीचे अंतीम निकाल लागल्यानंतर त्यांच्या पदोन्नतीचा प्रशासन विचार करणार आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

मागील अनेक वर्षापासून पालिकेतील सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ मिळावा म्हणून म्युनसिपल कर्मचारी कामगार सेना प्रशासनाकडे पाठपुरावा करत होती. याविषयी आयुक्तांबरोबर यापूर्वी आणि आताही बैठका झाल्या होत्या. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी झाली.



## वायु प्रदुषण, कामगार अपघात तर रस्त्यावर लोखंडी धातू टाकणाऱ्या विराज कारखान्याला लगाम लावणार कोण?

**पालघर (सुचिता सोनावणे)** - बोईसर येथील तारापूर औद्योगिक क्षेत्रात वायु प्रदुषण, कारखान्यात अपघात होऊन कामगारांना गमवावा लागणारा जीव तर कधी अवयव, कारखान्याचा भंगार वाहतूक करताना ट्रक मधून रस्त्यांवर पडणारा टोकदार लोखंडी धातू , ना दुरूस्त अवजड वाहनांमुळे होणारे अपघात, रस्त्यावर दुतर्फा बेशिस्त वाहान पार्किंग मुळे वाहतूक कोंडी समस्या अशा अनेक कारणांमुळे तारापूर औद्योगिक क्षेत्रातील नेहमीच चर्चेत असलेला विराज कारखानावर प्रशासन खूपच मेहरबान दिसतोय.

यामध्ये सर्वांत महत्वाचा मुद्दा म्हणजे प्रदुषण याबाबत अनेक तक्रारी करुनही ग्रामस्थांचा विरोध असूनही विराज कंपनीच्या मनमानी कारभाराला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळही सहकार्य करीत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील विराज कारखान्याचा वायू प्रदुषणाचा फटका आजूबाजूच्या परिसरातील रहिवासी लोकांना सर्वाधिक प्रमाणात बसतो.

## दिव्यांगांसाठी केलेल्या कामाचे समाधान हे आनंद देणारे - निवासी उपजिल्हाधिकारी डॉ संदीप माने

**ठाणे (यश सावंत)** - समाजातील दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या योजना राबविताना येणाऱ्या अडचणींवर मात करून, नियमांच्या चौकटीच्या बाहेर जावून जेव्हा शासकीय अधिकारी या योजना दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहोचवतात तेव्हा त्या व्यक्तींना होणारा आनंद हा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असतो. त्यापेक्षा जास्त आनंद हा या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणारा अधिकारी जेव्हा सेवानिवृत्त होतो तेव्हा मागे वळून पाहताना दिव्यांग व्यक्तींसाठी जे काम केले याचे त्याला समाधान मिळते, असे वक्तव्य निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने यांनी आज केले.

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा व्हावा यासाठी केंद्रशासनाच्या निर्देशानुसार आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनानुसार 19 डिसेंबर पासून ठाणे महापालिकेत सुशासन प्रशासन Good Goverence Week 2024 या सप्ताहाची सुरूवात झाली . या मोहिमेतंर्गत आज दिव्यांग व्यक्ती, विशेष शाळा, महिला व बालविकास कल्याणकारी योजना याबाबत माहितीपर चर्चासत्राचे आयोजन कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन कारण्यासाठी डॉ. तुशाबा शिंदे, संचालक प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभाग, भारत सरकार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने,

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी गणेश सांगळे, तहसीलदार किशोर मराठे, उमेश पाटील, उपायुक्त अनघा कदम, सहायक आयुक्त दशरथ वाघमारे, बाल संरक्षण अधिकारी रेखा हिरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, ठामपा जिद्द शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना शेटे, सामाजिक कार्यकर्ते गौतम गायकवाड, समन्वय अधिकारी आधार कुलकर्णी आदी उपस्थित होते. दिव्यांच्या योजना या त्यांच्यापर्यंत पोहचविण्यात प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांना वेगळाच आनंद मिळत असतो, अशा कामांची प्रसिध्दी जरी मिळाली नाही तरी त्याचे आनंददायी क्षण प्रत्येकांनी वेचले पाहिजेत.

## शिवजल सुराज्य अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते २६ डिसेंबर रोजी शुभारंभ होणार

### शिवजल सुराज्य अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा- मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

**ठाणे (रोहित जैसवाल)** - ठाणे ग्रामीण भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत "शिवजल सुराज्य अभियान" राबविण्यात येत असून या अभियानाचे शुभारंभ दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शहापूर तालुक्यात करण्यात येणार आहे. मुरबाड व शहापूर तालुक्यातील टँकर ग्रस्त गावात ८५ तर इतर सर्व तालुक्यात १ हजार ५१५ वनराई बंधारे बांधण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा व लोकचळवळ उभारून अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे विशेष प्रयत्न या अभियानामार्फत करत आहे. गाव परिसरात पाण्याची साठवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून; तसेच भूजल पातळी वाढण्यास मदत होण्यासाठी ओढ्यातील वाया जाणारे पाणी अडवून वनराई पद्धतीचा बंधारा बांधण्यात येणार आहे. सिमेंटच्या किंवा अन्य मोकळ्या गोण्यांमध्ये वाळू भरून बंधारा बांधला जाणार असून बहुतेक शेतकऱ्यांच्या शेतालगतच्या परिसरातून ओढा, नाला वाहत असल्याने पावसाळा संपल्यावर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर आढ्या, नाल्यावर वनराई बंधारे बांधणे शेतकऱ्यांना वरदान ठरणार आहे. तसेच छतावरील पाऊस पाणी संकलनाची विविध योजनेतुन मंजुर कामे सुरु करण्यात येणार आहेत. जानेवारी अखेर पर्यंत वनराई बंधारे कामे पुर्ण करण्यासाठी लोक सहभाग, सामाजिक संघटना, शासकीय अधिकारी, कर्मचारी संघटना, जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था (NGO), ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे, आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. या अभियानासाठी पुर्न: भरणाचे उद्दीष्ट व पाणी साठवण करण्यासाठी शहापूर तालुक्यात वनराई बंधारे/कच्चे बंधारे – ५० नियोजित काम असून त्याद्वारे साठवण ५० दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तर मुरबाड तालुक्यात वनराई बंधारे/कच्चे बंधारे – ३५ नियोजित काम असून त्याद्वारे साठवण ३५ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तसेच शहापूर व मुरबाड तालुक्यातील टँकर ग्रस्त गाव व्यतिरिक्त अंबरनाथ तालुका -१००, कल्याण तालुका - १००, भिवंडी तालुका - ४५०, मुरबाड तालुका -४१५, शहापूर तालुका -४५० असे एकूण १ हजार ५१५ वनराई बंधारे/कच्चे बंधारे तयार करण्यात येणार आहे. दि. २६ डिसेंबर, २०२४ ते ३० डिसेंबर, २०२४ पर्यंत ग्रामसेवक व कृषी सहाय्यक, यांनी प्रत्येक गावात शिवार फेरी घेऊन पाण्याचा ताळेबंद करून पाण्याच्या भूजल वाढीसाठी उपाययोजना राबवण्याच्या उद्देशाने काम करणार आहेत तसेच गटविकास अधिकारी यांनी उप अभियंता (पापु) पंचायत समिती, उप अभियंता, तालुका जलसंधारण अधिकारी (लपा) व कृषी अधिकारी यांचे मार्फत छाननी करून यंत्राणानिहाय योजनांचा आराखडा तयार करणार आहेत.

## सुशासन सप्ताह" अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

### दैनंदिन कामकाजाच्या माध्यमातून कार्यालयाची उत्तम प्रतिमा निर्माण व्हायला हवी -निवृत्त सनदी अधिकारी श्यामसुंदर पाटील

**ठाणे (सम्यक कासारे)** - दैनंदिन कामकाजाच्या माध्यमातून आपल्या शासकीय कार्यालयाची उत्तम प्रतिमा निर्माण व्हायला हवी. त्याबाबत एक व्हिजन ठेवून काम करणे आवश्यक आहे, सुशासन सप्ताहाच्या निमित्ताने आपल्या सर्वांना ही सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकारी ॲड. श्यामसुंदर पाटील यांनी आज येथे केले. दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत "सुशासन सप्ताह" साजरा केला जात आहे. या अभियानांतर्गत विविध शासकीय विभाग/कार्यालयाकडून शिबिरे आयोजित करून, देण्यात येणाऱ्या विविध सेवा, प्राप्त/ प्रलंबित तक्रारी अर्जावर कार्यवाही करून, जलदगतीने निपटारा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यानिमित्ताने "सुशासन सप्ताह"अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे "जिल्हास्तरीय कार्यशाळा"आज (दि.२३ डिसेंबर) आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) श्री.मल्लिकार्जुन माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, तहसिलदार श्री. किशोर मराठे, श्री.थोरात, ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी श्रीम.सावंत व विविध शासकीय विभागांचे जिल्हास्तरीय अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

निवृत्त सनदी अधिकारी ॲड. श्यामसुंदर पाटील पुढे म्हणाले की, सुशासन हा तसा गहन विषय आहे. पूर्वी आपण रेल्वेचे तिकीट काढताना तास न् तास रांगेत उभे राहायचो परंतू गतिमानता, उत्तरादायित्वामुळे व पारदर्शकतेमुळे आता सेवा संगणकीय स्वरूपात तात्काळ उपलब्ध होवू लागली आहे. शासकीय कामकाजात पारदर्शकता, गतिमानता आली आहे. जनतेचा सहभाग महत्वाचा आहे. शासनात कायद्यांबाबत सर्वांना समान संधी दिली जाते. कार्यक्षमतेबाबत सर्वांना समान न्याय दिला पाहिजे व त्याची अंमलबजावणी व्यवस्थित करता आली पाहिजे. ठाणे जिल्हयात जनतेच्या तक्रारी येत असतात मात्र




या तक्रारींचा जिल्हा प्रशासनाकडून निपटाराही केला जातो.

सेतू केंद्र तसेच विविध अभियानांच्या माध्यमातून दुर्बल आर्थिक घटकांसाठी ग्रामीण क्षेत्रात पोहोचणे गरजेचे आहे. जनतेला केंद्रस्थानी ठेवून डिजिटल सेवा प्रभावीपणे पुरविणे, ही काळाची गरज आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेवा बाबत काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे. यूट्यूब, फेसबुक, एक्स, माहिती व तंत्रज्ञान, दुर्बल घटकांपर्यंत पोहोचायला हवे. ठाणे जिल्हा हा आदिवासी ते शहरी व ग्रामीण क्षेत्रात विखुरला आहे. यात सध्या माझी वसुंधरा, वनहक्क, मतदारयादी अद्ययावत करणे अशा विविध प्रकारची कामे ठाणे जिल्हा प्रशासनाने उत्कृष्टरित्या केली आहेत. उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने यांनी लोकसभा व विधानसभा निवडणूक नुकतीच पार पडली असून या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणी, त्याचप्रमाणे सर्वसमावेशकता म्हणजे काय या विषयावर आपले मत व्यक्त केले. यावेळी मतदान वाढविण्याबाबत तृतीय पंथ, आदिवासी गट, बेघर मतदार, दिव्यांगांनी दिलेल्या योगदानाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. या कार्यशाळेच्या निमित्ताने केलेल्या प्रस्तावनेत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या काळात सुशासन सप्ताहाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजन करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. ते म्हणाले की, सर्व शासकीय विभाग कामकाज करीत असतात. परंतू नियमित अहवाल सादर न केल्यामुळे आपल्या कामाची नोंद होत नसते. त्यामुळे आपल्या जिल्ह्याची उदिष्ट्यपूर्ती झालेली दिसून येत नाही. आपण जनतेला सेवा देत असताना ई-सेवा केंद्र, आपले सरकार पोर्टलद्वारे विविध योजना राबवित असतो. झालेल्या कामकाजाचा अहवाल नियमित पाठविल्यास केंद्रशासनाकडून दखल घेतली जाईल. यावेळी ठाणे महानगरपालिकेमार्फत स्मार्ट सिटी, वॉटर सप्लाय, रेल्वे स्थानक, अर्बन रेस्टरुम, तलाव, डिजी ठाणे ॲप, अमृत योजना या क्षेत्रात होत असलेल्या कामांचे सादरीकरण श्री. गायकवाड यांनी केले. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी श्रीम.सावंत यांनी माझी वसुंधरा अभियानाचे हे पाचवे वर्ष असून भूमी, अग्नी, वायू, जल, प्रदूषण, आकाश त्याचबरोबर वृक्ष लागवड, हरित आच्छादन, ओला सुका/ कचरा, हवा गुणवत्ता, ई-बसेस योजना, डिप क्लिनिंग, खत घनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा या विषयांवर बचतगट व विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेऊन उपक्रम राबविणे, नागरिकांचा सहभाग घेणे, ई-शपथ माहिती अपलोड करणे अशा अनेक विषयांवर सादरीकरण केले.




## सेवानिवृत्ती मुख्याध्यापक भगवान जाधव शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित !

**वासिंद (विशाल पाटील)**- येथील सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्ती मुख्याध्यापक भगवान जाधव यांना रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी लिजेंडस् ठाणे आणि फॅन्ड्री फौंडेशनतर्फे शिक्षक रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शहापूर येथे वैश्य समाज हॉलमध्ये आयोजित एका भव्य कार्यक्रमात खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपल्या सेवा काळात भगवान जाधव यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे, नियोजन व उपयोजन करून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## विनाविलंब कामे पूर्ण करणे हाच सुशासन प्रशासनाचा महत्वाचा धागा – उपायुक्त उमेश बिरारी

**ठाणे (विशाल कारंडे) :** शासनाचा कारभार हा चांगल्या प्रकारे राबविणे म्हणजेच सुशासन प्रशासन. शासनाकडून प्रसिध्द होणारा किंवा अभ्यागतांकडून येणारा प्रत्येक सरकारी कागद हा काळजीपूर्वक वाचला की अनेक कामे सहज सोपी होतात. तसेच टिपणी लेखन हा सुशासनाचा आत्मा असून निर्णय प्रक्रियेत टिपणी हा महत्वाचा घटक ठरतो. टिपणीत वरिष्ठांचे मार्गदर्शन हवे असल्यास ते कर्मचाऱ्यांनी तात्काळ घेतल्यास कामे विनाविलंब पूर्ण होण्यास मदत होते, हाच सुशासन प्रशासनाचा धागा असल्याचे मत ठाणे महापालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी यांनी आज कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात व्यक्त केले.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार 19 ते 24 डिसेंबर या कालावधीत 'प्रशासन गाव की ओर' या उपक्रमातंर्गत 'सुशासन सप्ताह' महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिकेत राबविण्यात येत आहे. याच उपक्रमाअंतर्गत, महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'सुशासन प्रशासन' या विषयावर उपायुक्त उमेश बिरारी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांच्यासह उपायुक्त, विविध विभागांचे विभागप्रमुख तसेच अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. टिपणी करताना त्यात सर्व मुद्द्यांचा विचार केलेला असणे महत्त्वाचे आहे, टिपणीसाठी वरिष्ठांचे,अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन किंवा सल्ला घेणेही अपेक्षित असते. टिपणी सादर करणाऱ्या कनिष्ठ स्तरावरील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या उपप्रश्नांचा विचार न करता प्रकरण सादर झाले तर ते पुन्हा परत येण्याची शक्यता निश्चित असते. तसेच टिपणी पाल्हाळिक नसावी. महत्त्वाचे मुद्दे ओघवत्या शैलीत व शुद्ध भाषेत मांडलेले असावेत, असेही उपायुक्त उमेश बिरारी यांनी नमूद केले. शासकीय कामकाज करताना टपालात आलेल्या कागदावर आवकचा शिक्का बसला की, तो सरकारी कागद होतो. हा कागद पक्षकार परत मागू शकत नाही आणि सरकारी कर्मचारी तो कागद परत करू शकत नाही, तो कागद शासनाचा अभिलेख होतो. त्या कागदाची अन्य व्यक्तीस फक्त नक्कल देण्यात येते. कार्यविवरण पध्दतीत अंतर्गत बटवडा प्रणालीतून प्राप्त झालेले प्रकरणाची नोंद तात्काळ कार्यविवरण नोंदवहीत घेण्यात येते. दर आठवड्यास, साप्ताहिक किंवा पंधरा दिवसानंतर. पाक्षिक गोषवारा काढण्यात येतो. या गोषवाऱ्याच्या माध्यमातून प्रलंबित संदर्भाची माहिती तात्काळ मिळण्यास मदत होत असल्याचेही उपायुक्त उमेश बिरारी यांनी नमूद केले. शासकीय अभिलेख ठेवण्याच्या सहा गठ्ठा पध्दतीत प्रलंबित प्रकरणे, प्रतिक्षाधीन प्रकरणे, नियतकालिके, स्थायी आदेश संचिका, अभिलेख कक्षात जाणारे कागदपत्र, स्मरणपत्रे आदी सर्व बाबीं विषयी त्यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक सरकारी आस्थापनात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे नागरिकांकडून येणारा माहितीचा अधिकार. या माहितीच्या अधिकाराकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

# पॅकअप होताच मृणाल ठाकूरचा आनंद गगनात मावेना, 'पुष्पा 2' चित्रपटातील 'पीलिंग्स' गाण्यावर रील करत केली धमाल



अभिनेत्री मृणाल ठाकूर सोशल मीडियावर सक्रिय असते. ती अनेकदा तिचे अनेक लहान व्हिडीओज, रिल्स सोशल मीडियावर शेअर करत असते. मृणाल या रिल्स शूटिंग सेटवर, किंवा मेकअप रूममध्ये असताना मिळणाऱ्या वेळात शेअर करते. याच रिल्समधून ती अनेकदा हलकेफुलके क्षण शेअर करते. यात ती कधी मराठी गाणी म्हणते, कधी अहिराणी भाषेत बोलते तर कधी तिच्या सहकाऱ्यांबरोबर गमतीदार व्हिडीओ शेअर करते. आता मृणालने असाच एक नवी रील शेअर केली आहे.

मृणालने नवी रील इन्स्टाग्राम स्टोरीवर पोस्ट केली आहे. यात तिने शूटिंग संपल्यानंतर रील शेअर केला असून यात ती अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या सिनेमातील 'पीलिंग्स' गाण्यावर लिपसिंग करत सुंदर एक्स्प्रेशन दिले आहेत. शूटिंग संपल्याचा आनंद म्हणून आवडत्या गाण्यावर डान्स हे कॅप्शन तिने रीलवर लिहिले आहे. पॅकअपच्या आनंदात मृणालने ही रील तयार केली आहे.


या रीलच्या सुरुवातीला गाणे सुरु झाल्यावर मृणाल गाण्यांच्या संगीताबरोबर तिच्या भुवया वरखाली करते. त्यानंतर गाण्यांच्या कडव्यानुसार चेहऱ्याचे हावभाव बदलत उत्कृष्ट एक्स्पेशन देते. या रीलवर मृणाल गादीवर झोपल्याचे दिसत आहेत. व्हिडीओच्या शेवटी आपला हात चेहऱ्यावर ठेवत मृणाल 'पीलिंग्स' गाण्यांवर जागेवरच स्टेप्स करते. मृणालने रीलवर मी कोळंबी फ्राईड राईस खाल्ल्याने मला डान्स करावा लागला असे लिहिले आहे.

मृणालने शूटिंग संपल्यानंतर रील शेअर केला असून यात ती अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या सिनेमातील 'पीलिंग्स' गाण्यावर लिपसिंग करत सुंदर एक्स्प्रेशन दिले आहेत.

मृणालने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर अनेक व्हिडीओज शेअर केल्या आहेत. या सर्व व्हिडीओत मृणालने अनेकदा मराठीत बोलताना स्टोरी शेअर केल्या आहेत. तिने याआधी मराठी बोलताना, मराठी गाणी म्हणताना व्हिडीओज शेअर केल्या आहेत. मृणालला इन्स्टाग्रामवर तिच्या एका चाहत्याने ती मराठी आहे का? हा प्रश्न विचारला होता. हे सांगताना मृणालने तिच्या सहकाऱ्यांसह ती मराठी आहे हे दाखवण्यासाठी एक गाणे म्हणून दाखवले. मृणालने तिच्या सहकाऱ्यांसह 'सांग सांग भोलानाथ' हे गाणे म्हणून दाखवले होते.

मृणाल ठाकूरने 'मुझसे कुछ केहती है...ये खामोशीया' या हिंदी मालिकेतून अभिनयक्षेत्रात पदार्पण केले. तिला 'कुम कुम भाग्य' या मालिकेतून खरी ओळख मिळाली. पुढे तिने 'लव्ह सोनिया' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. मृणालने 'सुपर ३०' चित्रपटात हृतिक रोशनबरोबर स्क्रीन शेअर केली होती. तिचा 'सीता रामम' हा सिनेमा लोकप्रिय झाला. आता मृणाल ठाकूर लवकरच 'सन ऑफ सरदार २' या चित्रपटात दिसणार आहे.

## गश्मीर महाजनी व मृण्मयी देशपांडे एकत्र झळकणार; 'एक राधा एक मीरा' मराठी चित्रपटातून भेटीला येणार



अभिनेता गश्मीर महाजनीहा नुकताच 'फुलवंती' या चित्रपटात प्राजक्ता माळीबरोबर प्रमुख भूमिकेत दिसला होता. आता पुन्हा एकदा अभिनेता लवकरच एका नवीन मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. लोकप्रिय अभिनेत्री मृण्मयी देशपांडे बरोबर गश्मीर महाजनी स्क्रीन शेअर करणार आहे. 'एक राधा एक मीरा' या चित्रपटातून हे कलाकार प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसणार आहेत.

### 'या' मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार

अभिनेत्री मृण्मयी देशपांडेने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये मृण्मयी देशपांडे व गश्मीर महाजनी दिसत आहेत. शेवटच्या फ्रेममध्ये सुरभी भोसलेसुद्धा दिसत आहे. या व्हिडीओमध्ये प्रेम म्हणजे प्रेम असतं, राधा असो वा मीरा; सगळ्यांचं सेम असतं? या ओळी लिहिलेल्या दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये 'अंतरीचा सूर हलकेच असा उमटला...' अशी सुरुवात असलेले एक गाणे ऐकायला येत आहे.

मृण्मयीने व्हिडीओ शेअर करीत लिहिले, "एक राधा, त्याची अबोल प्रीत. एक मीरा, त्याचे श्यामल गीत. प्रेमाच्या कॅनव्हासवर उमटलेली एक नितांत सुंदर, म्युझिकल लव्ह स्टोरी." पुढे अभिनेत्रीने या चित्रपटात आणखी कोणते कलाकार दिसणार आहेत, हेही लिहिले आहे. सुरभी भोसले, मेधा मांजरेकर, आरोह वेलणकर व संदीप पाठक हे कलाकारदेखील महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. महेश मांजरेकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, अविनाशकुमार प्रभाकर अहाले यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाची कथा किरण यज्ञोपवित यांनी लिहिली आहे. हा चित्रपट ७ फेब्रुवारी २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीर महाजनीनेदेखील अशीच पोस्ट त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे. आता समोर आलेल्या व्हिडीओवरून हा प्रेमकथेवर आधारित चित्रपट असल्याचे दिसत आहे. मात्र, चित्रपटाची नेमकी गोष्ट काय, मृण्मयी व गश्मीर कोणत्या भूमिकांमध्ये दिसणार, त्यांची गोष्ट काय असणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

## मालिका संपल्यानंतर कोकणात पोहोचल्या ऐश्वर्या नारकर, चुलीवर केला स्वयंपाक



'घे भरारी', 'तूच माझी भाग्यलक्ष्मी', 'सत्ताधीश', 'घर गृहस्थी', 'साक्षात्कार', 'रणरागिनी', 'ओळख', 'सून लाडकी सासरची', 'एक काळोखी रात्र' ते 'येलो', 'बाबांची शाळा', 'धडक' या आणि अशा अनेक मराठीसह हिंदी चित्रपटांत काम करत प्रेक्षकांचे मनोरंजन करणाऱ्या अभिनेत्री म्हणजे ऐश्वर्या नारकर चित्रपटांसह त्यांनी नाटक-टीव्ही मालिकांमध्येही काम केले आहे.

अभिनेत्री ऐश्वर्या नारकर या झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत काम करताना दिसल्या. या मालिकेने नुकताच प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. आता ऐश्वर्या नारकर यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडीओ चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. त्या कोकणात गेल्याचे या व्हिडीओवरून समजत आहे. त्या चुलीसमोर बसल्या असून चुलीवर एक भांडे असल्याचे दिसत आहे. या व्हिडीओवर त्यांनी 'कोकण व्हाइब्ज'असे लिहून त्यासमोर हार्ट इमोजी शेअर केल्याचे दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करताना त्यांनी 'फील' अशी कॅप्शन लिहिले आहे. 'अभी ना जाओ छोड़ कर' हे गाणे ऐकायला मिळत आहे. त्यांच्या या व्हिडीओवर अनेकांनी हार्ट इमोजी शेअर करत प्रेम व्यक्त केले आहे.

ऐश्वर्या नारकर या विविध व्हिडीओ, रील्सच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात, मनोरंजन करत असतात. अनेकदा त्या सहकलाकारांबरोबरदेखील रील्स करताना दिसतात. अभिनेते व पती अविनाश नारकर यांच्याबरोबरचे डान्सचे व्हिडीओ ऐश्वर्या नारकर शेअर करताना दिसतात. त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या रील्सवर प्रेक्षक कमेंट्स करत त्यांचे प्रेम व्यक्त करताना दिसतात. हे जोडपे चाहत्यांचे आवडते असल्याचे पाहायला मिळते. अविनाश नारकर सध्या नुकत्याच प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या स्टार प्रवाह वाहिनीवरील 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत काम करताना दिसत आहेत, तर ऐश्वर्या नारकर काम करत असलेल्या 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेने नुकताच प्रेक्षकांचा निरोप घेतला.

## नरकाचं नवं द्वार खुलणार, पाताल लोकचा नवा सिझन १७ जानेवारी दिवशी येणार




प्राईम व्हिडीओची पाताल लोक या सुप्रसिद्ध वेब सिरिजच्या दुसऱ्या सिझनचा मुहूर्त अखेर ठरला आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून या वेब सिरिजचा दुसरा सिझन कधी येणार? येणार असे विचारले जात होते. शेवटी वेब सिरिज पाहण्याची आवड असणाऱ्यांची प्रतीक्षा आता संपली आहे.

### पाताल लोकचा दुसरा सिझन 'या' तारखेला येणार

पाताल लोक या सिरिजचा पहिला सिझन सर्वांनाच आवडला होता. या सिझनमधील दृश्ये, उत्कंठावर्धक कथा पाहून अनेकजण मंत्रमुग्ध झाले होते. या वेब सिरिजचं दिग्दर्शन अरुण धवरे यांनी केलं होतं. या पहिल्या सिझननंतर आता लगेच दुसऱ्या सिझनचाही मुहूर्त ठरला आहे. या दुसऱ्या सिझनमध्ये जयदीप अहलावत, इश्वाक सिंह आमि गुल पनाग यासारखे दिग्गज कलाकार दिसणार आहेत. यासोबतच तिलोत्तमा शोम, नागेश कुकुनूर जुन्हू बरुआ यासारख्या कलाकारांचीही या दुसऱ्या सिझनमध्ये महत्त्वाची भूमिका असणार आहे. पाताल लोकचा दुसरा सिझन भारतासहित एकूण २४० पेक्षा जास्त देशांत प्रदर्शित होणार आहे. तुम्हाला ही वेब सिरीज ॲमेझॉन प्राईमवर १७ जानेवारी २०२५ पासून पाहता येईल.

### पातल लोकच्या दुसऱ्या सिझनमध्ये नेमकं काय असणार?

पाताल लोकचा पहिले सिझन लोकांच्या चांगलेच पसंतीस पडले होते. या सिरिजमधील क्लायमॅक्स पाहून तर अनेकजण थक्क झाले होते. न्याय, भ्रष्टाचार आदींवर समस्यांवर विचार करायला लावणारी ही सिरिज आहे. या वेब सिरिजमध्ये हातीराम चौधरी नावाचे मुख्य पात्र आहे. या पात्रपुढे दुसऱ्या सिझनमध्ये नवी आव्हानं असणार आहेत.

## गौतमी पाटीलची आता छोट्या पडद्यावर जबरदस्त एन्ट्री, 'आता होऊ दे धिंगाणा ३' लोकप्रिय कार्यक्रमात पाहायला मिळणार



आपल्या दिलखेच अदा आणि नृत्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणी गौतमी पाटील नेहमी चर्चेत असते. गौतमीने आपल्या नृत्य कौशल्याने सगळयांची मनं जिंकली आहेत. तिचा चाहता वर्ग खूप मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तिच्या प्रत्येक कार्यक्रमाला गर्दी मोठ्या प्रमाणात होतं असते. सध्या गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचे प्रमाण आणि तिची प्रसिद्धी दिवसेंदिवस वाढत आहे. तसंच गौतमी अभिनय क्षेत्राकडे वळली असून मराठी सिनेसृष्टीत सक्रिय झाली आहे. आता गौतमी छोट्या पडदा गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. लवकरच एका लोकप्रिय कार्यक्रमात गौतमी पाटील पाहायला मिळणार आहे.

हो, हे खरं आहे. गौतमी पाटील महाराष्ट्राची नंबर वन वाहिनी 'स्टार प्रवाह'वर झळकणार आहे. 'स्टार प्रवाह'वरील लोकप्रिय कार्यक्रम 'आता होऊ दे धिंगाणा ३'मध्ये गौतमी पाटील दिसणार आहे. या कार्यक्रमात गौतमीची ठसकेबाज लावणी पाहायला मिळणार आहे. याचा प्रोमो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

'स्टार प्रवाह'च्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर गौतमी पाटीलचा प्रोमो शेअर करण्यात आला आहे. "नृत्यांगना गौतमी पाटील थिरकणार धिंगाणाच्या मंचावर...", असं कॅप्शन लिहित 'आता होऊ दे धिंगाणा ३'चा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये गौतमीची जबरदस्त लावणी पाहायला मिळत आहे. गौतमीच्या अदा, लावणी पाहून विशाल निकम शिट्टी वाजवताना दिसत आहे. 'आता होऊ दे धिंगाणा ३'च्या येत्या भागात हे पाहायला मिळणार आहे.

दरम्यान, गौतमी पाटीलच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'मूषक आख्यान' चित्रपटात गौतमी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्याबरोबर झळकली. त्याआधी 'लाईक आणि सबस्क्राईब' चित्रपटातील एका गाण्यात गौतमीचा जबरदस्त डान्स पाहायला मिळाला. या चित्रपटातील 'लिंबू फिरवलं' या गाण्यात गौतमी अमेय वाघबरोबर थिरकली होती. त्यानंतर गौतमी पाटील ज्येष्ठ अभिनेत्री अलका कुबल, सई ताम्हणकर, शिव ठाकरेबरोबर झळकणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. गौतमी पाटीलने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला होता. या व्हिडीओमध्ये गौतमीसह अलका कुबल, सई ताम्हणकर, शिव ठाकरे पाहायला मिळाले होते.

## घरावर झालेल्या दगडफेकीनंतर अल्लू अर्जुनने मुलांसह सोडलं घर



पुष्पा २ फेम अभिनेता अल्लू अर्जुन मागील काही दिवसांपासून बराच चर्चेत आहे. रविवार २२ जानेवारी रोजी काही अज्ञातांनी अल्लू अर्जुनच्या घरावर दगडफेकही केली. खरं तर, संध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाल्यानंतर, न्यायाची मागणी करणाऱ्या आंदोलकांनी हैदराबादमधील अल्लू अर्जुनच्या घरी गोंधळ घातला.स्मानिया युनिव्हर्सिटी जॉइंट ॲक्शन कमिटी (OU-JAC) चे सदस्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंदोलकांनी अल्लू अर्जुनच्या घरावर दगडफेक केल्याची माहिती आहे. या हल्ल्यानंतर अल्लू अर्जुनने त्याच्या मुलांसह सध्या त्याचं राहतं घर सोडलं आहे.

सोशल मीडियावर सध्या एक व्हिडीओ व्हायरल होत असल्याचं पाहायला मिळतंय. यामध्ये अल्लू अर्जुन त्याची मुलं अल्लू अरहा आणि अल्लू अयानसोबत घराबाहेर पडताना दिसतोय. यावेळी मीडियाने कारला घेरले तेव्हा आत बसलेली अभिनेत्याची मुलगी अरहा खूप अस्वस्थ दिसली. या हल्ल्यानंतर अल्लू अर्जुनने त्याच्या मुलांना त्यांच्या आजोबांच्या घरी सोडलं असल्याची माहिती सध्या समोर आलेली आहे. तसचे या हल्ल्यतील सहा जणांवर पोलिसांनी आतापर्यंत कारवाई केली आहे.

### अल्लू अर्जुनच्या वडिलांनी केला घटनेचा निषेध

या घटनेनंतर अल्लू अर्जुनने काही भाष्य केललं नाहीये. मात्र त्याचे वडील अल्लू अरविंद यांनी रविवारी रात्री प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांच्या घरावरील हल्ल्याचा निषेध केला आणि अशा घटनांना प्रोत्साहन देऊ नये, असे सांगितले. अल्लू अर्जुनच्या घरी पत्रकारांशी बोलताना अभिनेत्याचे वडील अल्लू अरविंद म्हणाले, "आज आमच्या घरी काय झाले ते सर्वांनी पाहिले आहे. पण आता वेळ आली आहे की आपण त्यानुसार वागू. सध्या आपल्यासाठी कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देण्याची योग्य वेळ नाही.

पुढे त्यांनी म्हटलं की, पोलिसांनी तोडफोड करणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. अशा घटनांना कोणीही प्रोत्साहन देऊ नये. पण केवळ मीडिया इथे आहे म्हणून मी प्रतिक्रिया देणार नाही. आता संयम बाळगण्याची वेळ आली आहे.

### पोलिसांनी ६ जणांना केली अटक

दरम्यान, या हल्ल्यानंतर पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. सध्या पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. ही घटना संध्याकाळी ४:४५ च्या सुमारास घडली, जेव्हा काही लोकांनी अल्लू अर्जुनच्या घराबाहेर घोषणाबाजीला सुरुवात केली. डीसीपी पश्चिम विभाग, हैदराबाद यांनी सांगितले की, आरोपींवर कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## राशी भविष्य




**मेष** – वरिष्ठांच्या सहकार्यानेच वागावे लागेल. अधिक परिश्रमाची कामे टाळा. मानसिक शांतता लाभेल. प्रवासाचे नियोजन कराल.

**वृषभ** – नवा परिचय होईल. आरोग्य उत्तम राहील. प्रतिस्पर्ध्यांसोबत एखाद्या गहन चर्चेत सहभागी होऊ नका. खरेदी कराल.

**मिथुन** – मौजमजेसाठी पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. काहीतरी नवनिर्मिती कराल. वाद-विवादात पडू नका. घरगुती कामे होतील.

**कर्क** – जोडीदारासोबत वेळ घालवाल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. शक्य असल्यास वाद टाळा. कार्याला योग्य दिशा मिळेल.

**सिंह** – अधिक खर्च होणार नाही याचे भान ठेवा. जुनी येणी वसूल होतील. आरोग्य जपा. महत्त्वाचे काम करण्यात आळस करू नका.

**कन्या** – प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. मानसिक, शारीरिक परिश्रम अधिक होतील. वाहन जपून चालवा. धंद्यात काम मिळेल.

**तूळ** – नोकरीत आपले वर्चस्व राहील. घरात क्षुल्लक कारणावरून तणाव होईल. आर्थिक बाबतीत व्यवस्थित योजना तयार कराल.

**वृश्चिक** – कोर्टाच्या कामाला दिशा मिळेल. नातेवाईकांसोबत वादाचे प्रसंग येतील. वैचारिक दृढतेमुळे कामे चांगल्या रीतीने पूर्ण कराल.

**धनु** - धंद्यातील चर्चा यशस्वी होईल. आपण ठरवलेले काम पूर्ण करता येईल. मुलांची चिंता सतावेल. मान-सन्मान मिळेल.

**मकर** – नोकरीत कामाचा आळस करू नका. आपले वरिष्ठ प्रसन्न होतील. बोलण्यामुळे गैरसमज होणार नाहीत याचे भान ठेवा.

**कुंभ** – रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. मैत्रीत वाढ होईल. वरिष्ठांपासून सांभाळून राहा. गृहस्थ जीवनाचा पूर्ण आनंद घ्याल. व्यवसायात यश मिळेल.

**मीन** – नवीन ओळखीचा उपयोग होईल. रचनात्मक आणि कलात्मक शक्तीला चालना मिळेल. तक्रारीला वाव देऊ नका.

# वरळीतील महात्मा फुले नगरमधील महिलांचा शौचालयासाठी आंदोलनाचा इशारा



## ■ सागरी किनारा बांधून होतो, पण शौचालयाला मुहूर्त नाही

**मुंबई (यश सावंत) :** वरळीतील महात्मा फुले नगरमधील झोपडपट्टीवासियांनी सार्वजनिक शौचालयाच्या मागणीसाठी रविवारी आंदोलन केले. विशेष म्हणजे ही झोपडपट्टी सागरी किनारा मार्गाला लागूनच आहे. एकाबाजूला महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून सागरी किनारा बांधला, तर दुसरीकडे वर्षभरापासून झोपडपट्टीवासियांसाठी शौचालय बांधण्याचे काम होऊ शकलेले नाही. त्यामुळे हा विरोधाभास रविवारी या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट दिसून आला. वरळी येथील महात्मा फुले नगरमधील झोपडपट्टीत सुमारे बाराशे कुटुंबे राहतात. या परिसरातील शौचालयाचे बांधकाम मुंबई महापालिकेने वर्षभरापूर्वी बंद केले. येथील रहिवाशांसाठी मुंबई महापालिकेने एक तात्पुरते फिरते शौचालय दिले आहे. मात्र या शौचालयाची स्वच्छता केली जात नाही, या शौचालयात पाण्याची सुविधा नाही, तसेच शौचालयाचा परिसरही अस्वच्छ आहे. त्यामुळे या परिसरात रोगराई पसरण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. या परिस्थितीला कंटाळून येथील रहिवाशांनी रविवारी या परिसरात मोर्चाचा इशारा दिला होता. मात्र पोलिसांनी मोर्चाला परवानगी न दिल्यामुळे रहिवाशांनी पोलिस ठाण्यात निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. या शौचालयाचे काम तीन दिवसांत सुरू करावे आणि एक महिन्याच्या आत शौचालयाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी या परिसरातील महिलांनी केली आहे.


मुंबईतील ६० टक्के जनता झोपडपट्टीत राहते. येथील नागरिकांना सार्वजनिक शौचालयांशिवाय (कम्युनिटी टॉयलेट) पर्याय नसतो. मात्र बहुतांशी ठिकाणच्या शौचालयांची दूरवस्था झाली आहे. काही ठिकाणी शौचालये मोडकळीस आली आहेत. त्यामुळे दुर्घटना होण्याचीही शक्यता असते. शौचकूपांची संख्या कमी असल्यामुळे एकेका शौचकूपाचा वापर मोठ्या संख्येने होतो. यावर उपाय म्हणून पालिकेने वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वस्त्यांमधील शौचालयांची संख्या वाढवण्याचे ठरवले आहे. गेल्यावर्षी पालिकेने लॉट ११ या उपक्रमांतर्गत २२ हजार शौचकूप बांधण्याचा संकल्प सोडला होता.

# गुजरातमधील तरुणाकडून बनावट नोटांचा मोठा साठा जप्त

## बनावट नोटा आल्या कुठून ? पोलिसांकडून सखोल तपास सुरू

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** बनावट नोटा चलनात आणण्याचा प्रयत्नात असलेल्या गुजरातमधील तरुणाला समर्थ पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून ५०० रुपयांच्या १४२ आणि शंभर रुपयांच्या ६१ अशा ७७ हजार रुपयांच्या बनावट आणि हुबेहूब दिसणाऱ्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. बनावट नोटा बाळगणाऱ्या तरुणाची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

गौरव रामप्रताप सविता (वय २४, रा. जामनगर, गुजरात) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई लखन शेटे यांनी समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, समर्थ पोलिसांचे पथकांकडून शुक्रवारी रात्री सराइतांची तपासणी (कोम्बिंग ऑपरेशन) करण्यात येत होती. वरिष्ठ निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पथक सोमवार पेठ, रास्ता पेठेतील लॉजची तपासणी करत होती. त्यावेळी एक जण रास्ता पेठेतील उंटाड्या मारुती मंदिराजवळ थांबला असून, त्याच्याकडे बनावट नोटा असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांचे पथक तेथे गेले. पोलिसांना पाहताच आरोपी गौरव तेथून पसार होण्याच्या तयारीत होती. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. समर्थ पोलीस



ठाण्यात गौरवला नेण्यात आले. त्याची झडती घेण्यात आली. त्यावेळी त्याच्याकडे पाचशे रुपयांच्या १४२ आणि शंभर रुपयांच्या ६१ अशा ७७ हजार २०० रुपयांच्या बनावट नोटा सापडल्या. बनावट नोटा बाळगल्याप्रकरणी त्याला अटक केली असून, त्याने बनावट नोटा कोणाकडून आणल्या यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

SPORT

# Brazil's Joao Fonseca Becomes 2nd Youngster Player To Win NextGen ATP Finals Title



New Delhi -Joao Fonseca became the second youngest champion of the NextGen ATP tournament on Sunday when he defied his lowly ranking of 145 to defeat Learner Tien in the final. Brazil's Fonseca, 18, came through 2-4, 4-3 (10/8), 4-0, 4-2 to see off his left-handed American opponent. He is the youngest champion at the event since current world number one Jannik Sinner claimed the title also at the age of 18 five years ago. "I was really nervous before the match. I knew it was going to be so difficult," Fonseca said before lifting the trophy with tennis legend Rafael Nadal watching on from the stands. "I played a final against Learner in juniors at the 2023 US Open and I know the way he can play. He is such a nice guy and a great player, so I knew it was going to be difficult, mentally and physically. But I got through." Fonseca, the lowest-ranked player in the eight-man field, won all five matches he played this week at the Red Sea venue. He began the year ranked at 730 in the world and having made a maiden ATP quarter-final in Rio this year, he will be aiming to make significant progress in 2025. "I need to believe when I go before a tournament that I can win," Fonseca said. "But now I have won it I am thinking, 'Wow, I made it'. I am very proud of myself."

# Yashasvi Jaiswal IN, Jasprit Bumrah OUT; Hardik Pandya Returns: India's Likely Squad For England ODI Series



New Delhi -The Indian cricket team will begin their ICC Champions Trophy preparations with an ODI series against England in India. The tour will start with the T20I leg before the focus shifts to the ODIs. India last played an ODI series against Sri Lanka where they lost the series 2-0. India should opt for a full-strength squad for the series. While senior Indian players might need some rest after the hectic Border-Gavaskar Trophy, with the Champions Trophy lined up in February, they won't get that window of rest.

Yashasvi Jaiswal could be slotted in the team as a backup opener. He was not part of the squad for the Sri Lanka ODIs. Shubman Gill should be the first-choice opener along with Rohit Sharma. Virat Kohli will be the no. three batters. Shreyas Iyer has shown great form in the white-ball tournaments recently. It should be a toss-up between him and KL Rahul for the middle order but Rahul might just edge out given that he can also keep. Rishabh Pant will be the specialist wicketkeeper. Hardik Pandya, who has been out of action for a while should return to the side. Axar Patel and Washington Sundar should be the spin-bowling all-rounders while Kuldeep Yadav could be the specialist spinner. Jasprit Bumrah could be rested for the series given that India can't afford to burn out Bumrah before the ICC event.

# Parthiv Patel offers solution to end India's frequent batting collapses

New Delhi - Former India cricketer turned commentator Parthiv Patel has provided a solution to India's frequent batting collapses in Test cricket. Notably, Indian batters have been in poor form off late as they were recently whitewashed in the home Test series against New Zealand.

The collapses have followed the team to Australia as well, which resulted in the loss in the second Test in Adelaide. Recently, Patel shared his opinion on the matter and mentioned India's weakness against facing spin on turning tracks at home. "There is no doubt that collapses have occurred, especially in home series. We have seen collapses on rank turner pitches against New Zealand. When we toured Australia, the collapses continued there," Patel said on Cricbuzz.

Further speaking ahead, the former wicket-keeper batter highlighted that the batting failures is not the result of extreme aggression and the Indian batters need to apply themselves more.



"I do not believe this has happened due to extreme aggression. If we respect the traditional style of Test cricket and bat with discipline, these are the same batters who have previously performed well. Indian batters need to apply themselves more because they have the ability. If they bat with discipline, they can succeed anywhere," he added.

India were recently bundled out for 46, which was their third lowest score, in the first Test against New Zealand in Bengaluru. The Indian batting has crumbled in both spinning and swinging conditions in the past few months. They failed to negate the threat of Ajaz Patel and Mitchell Santner in home conditions against New Zealand. In the ongoing series, India have been undone by the Australian pacers as they've surpassed the 300-run mark just once in the six innings so far in the series. Indian batters have struggled massively in Tests in the ongoing year with just two players, namely Yashasvi Jaiswal (52.48) and Shubman Gill (43.30) averaging over 40 among batters having over 203 runs to their name.

# Rohit Sharma Captain; Sanju Samson, Travis Head In: Best T20I World XI Of 2024

New Delhi - 2024 was an iconic year for T20 cricket in international cricket in which the 2024 T20 World Cup was held in what marked a historic moment for the sport as the United States of America (USA) hosted a global event for the first time in history. The tournament will be remembered for many iconic moments as Afghanistan reached the semi-finals after beating New Zealand and Australia in the final.



However, it was India's year, with the 2024 T20 World Cup proving to be the cherry on the cake. However, they dominated the format for 12 months as they lost just two of their 26 matches and ended the year with a remarkable win percentage of 92.31, which is the most by any team in history after playing more than 15 matches in a calendar year. It comes as no surprise that our Best T20I team of 2024 is dominated by Indian players, with performances in the mega event holding more weight. Rohit Sharma (C) - Rohit Sharma retired from T20I cricket just minutes after leading India to the 2024 T20 World Cup title. Rohit was the second-highest run-getter of the tournament with 257 runs in eight innings. He also scored the fifth T20I ton of his career against Afghanistan in January. Travis Head - Travis Head was in red-hot form in T20I cricket both at the franchise and international level in 2024. The Australian opener made 539 runs in 15 matches at a strike rate of 178.47. He was the third-highest run-getter of the 2024 T20 World Cup. Sanju Samson (WK) - Sanju Samson became the first batter in the world to score three T20I tons in a year and finished with 436 runs in 12 innings. He also made five ducks, which is the joint most by a top-order batter for a full-member nation. The 30-year-old was part of India's 2024 T20 World Cup-winning team but did not play any game.

# 'He Was Denied The Honour Of Being Vice-Captain..': Sunil Gavaskar Blasts India's Treatment Of R Ashwin

New Delhi - Former India cricketer Sunil Gavaskar has said that Ravichandran Ashwin would have made a fine skipper for India, but he was denied the honour of even being a vice-captain. He expressed his disappointment with the Indian team management's handling of Ashwin, alleging that they sidelined him in the name of team balance. Ashwin featured in just one of the first three Tests in the current series. He played in the Adelaide pink-ball Test where India received a 10-wicket thrashing and was dropped for the Brisbane Test, where he was replaced by allrounder Ravindra Jadeja, who proved his case with a crucial 77-run innings. Ashwin retired as India's second-highest wicket-taker in Tests, just behind former India cricketer Anil Kumble. He announced his retirement on



the final day of the Brisbane Test. "Ashwin would have made a fine captain for India, but he was denied even the honour of being the vice-captain. There was an opportunity to give him the belated honour even if it was for a token Test and a limited-overs bilateral series, but that also was denied to him," Gavaskar wrote in his column for Mid-Day. India surprisingly deployed a rotating policy for the only spinner's spot, with Washington Sundar playing in Perth, Ashwin in Adelaide and Jadeja in Brisbane.

# पालकमंत्रीपदासाठी ओढाताण; जिल्ह्या-जिल्ह्यांत महायुतीतील तिन्ही पक्षांची दावेदारी

● मुंबई, विशाल कारंडे :

निकालानंतर सुमारे महिनाभरानंतर अखेर मंत्रिमंडळ खातेवाटप झाल्यानंतर आता महायुतीमध्ये पालकमंत्रीपदांवरून रस्सीखेच सुरू झाली आहे. तिन्ही पक्षांचे अनेक ज्येष्ठ नेते एकेका जिल्ह्यातून मंत्री झाल्यामुळे त्यांनी पालकमंत्रीपदावर दावे ठोकायला सुरुवात केली आहे. त्याच वेळी आता मंत्रालयातील दालनांवरूनही रुसवेफुगवे होऊ लागले आहेत.

जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवण्यासाठी पालकमंत्रीपद महत्त्वाचे ठरते. विशेषत: जिल्हा नियोजन समितीकडील निधीचे वाटप पालकमंत्र्यांच्या अधिकारात होते. तसेच प्रशासकीय व पोलीस यंत्रणाही हाताखाली राहते. त्यासाठीच प्रत्येक मंत्र्याला आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळावे, अशी अपेक्षा असते. त्यामुळेच खातेवाटप जाहीर होताच आता पालकमंत्री होण्यासाठी चढाओढ बघायला मिळत आहे. रायगडचे पालकमंत्रीपद आपल्यालाच मिळाले पाहिजे, अशी अपेक्षा शिवसेनेचे भरत गोगावले यांनी उघडपणे व्यक्त केली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना गोगावले यांना झुकते माप मिळत असे. विशेषत: बदलत्या राजकीय समीकरणांत भाजप आणि अजित पवार गट अधिक जवळ आल्याने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष



सुनील तटकरे हे आपल्या मुलीसाठी म्हणजे आदिती तटकरे यांच्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावण्याची चिन्हे आहेत. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीत उघडउघड आरोप-प्रत्यारोप होण्याची चिन्हे आहेत. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्रीपदावर शिवसेनेचे संजय शिरसाट यांनी दावा ठोकला. भाजपचे अतुल सावे यांचाही पालकमंत्रीपदावर डोळा आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच कायम राहील, अशी चिन्हे आहेत.

### कार्यालयांवरून हेवेदावे

■ पूर्वी प्रत्येक विभागाची कार्यालये असलेल्या मजल्यावरच मंत्र्याचे दालन असायचे. पुढे मंत्र्यांची ज्येष्ठता व हेवेदावे यातून ही प्रथा मोडली. आपले दालन सहाव्या मजल्यावर असावे, अशी अनेकांची इच्छा असते. शिंदे सरकारमध्ये ३० मंत्री असताना काही जणांनी शेजारील कार्यालयांची जागा गिळंकृत करून आपली दालने मोठी केली. मात्र आता ४२ मंत्री आहेत. त्यात मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांना सहाव्या मजल्यावर जागा करून द्यावी लागेल. अन्य ३९ मंत्री व राज्यमंत्र्यांसाठी दालने उपलब्ध होणे कठीण होणार आहे. यापूर्वी जम्बो मंत्रिमंडळ असताना काही राज्यमंत्र्यांना विधान भवनात दालने थाटावी लागली होती. यावेळी ३३ कॅबिनेट मंत्र्यांना चांगल्या दालनाची अपेक्षा असल्याने वाद होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागू शकतो.

### अन्य जिल्ह्यांत कोणाची रवानगी?

■ सध्याच्या मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यामुळे एकापेक्षा अधिक मंत्रीपदे असलेल्या जिल्ह्यातील नेत्यांना बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भूषवावे लागेल. मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह ३५ कॅबिनेट मंत्री असल्याने राज्यमंत्र्यांनाही फार संधी मिळणे कठीण आहे.

## एनबीटीची वार्षिक उलाढाल प्रथमच ५०० कोटी रुपयांवर, आता देशभरात विस्तारीकरण

● पुणे, अभिजीत येरल्लू :

राष्ट्रीय पुस्तक न्यास आता स्वयंपूर्ण झाला आहे. संस्थेचे देशभरात विस्तारीकरण करण्यात येत आहे. पुण्यासह विविध शहरांत कार्यालये सुरू होणार आहेत. संस्थेची वार्षिक उलाढाल आता ५०० कोटी रुपयांवर गेली आहे. त्यातील सुमारे ५० टक्के वाटा बालसाहित्याचा असल्याची माहिती न्यासाचे संचालक कर्नल (नि.) युवराज मलिक यांनी दिली. पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद आणि महोत्सवातील पुस्तक विक्रीची उलाढाल याबाबतीत पुणे पुस्तक महोत्सव दिल्लीत होणाऱ्या जागतिक पुस्तक महोत्सवाखालोखाल दुसऱ्या स्थानी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने देशभरातील प्रकाशन उद्योग, मराठी प्रकाशन, एनबीटीचे काम, डिजिटल काळात वाचन संस्कृती, वाचन संस्कृती वृद्धिंगत करणे अशा अनुषंगाने ‘लोकसत्ता’ने मलिक यांच्याशी संवाद साधला.



मलिक म्हणाले, ‘भारतातील प्रकाशन उद्योग हा जगातील सर्वांत मोठ्या उद्योगांपैकी एक आहे. या उद्योगाची वार्षिक उलाढाल सुमारे एक लाख कोटी रुपयांची आहे. विशेष म्हणजे हा सर्वांत वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. शिक्षण क्षेत्रात करण्यात आलेल्या सुधारणांमध्ये मातृभाषांना महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे देशातील सर्व अनुसूचित भाषांना महत्त्व मिळणार आहे. या भाषांमध्ये नवीन आशयाची निर्मिती केली जाणार आहे. परिणामी, संपूर्ण प्रकाशन व्यवसायाला आणखी प्रोत्साहन मिळणार आहे.’

करोना काळानंतर पुस्तकांच्या मागणीत वाढ झाल्याचेही मलिक यांनी सांगितले. ‘एनबीटीतर्फे शाळा स्तरापासून तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येते. त्यात २० ते २५ राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शने, २०० पेक्षा जास्त जिल्हास्तरीय प्रदर्शने आयोजित करण्यात येतात. त्याला मिळणारा प्रतिसाद सकारात्मक आहे. करोना काळानंतर अचानक पुस्तकांच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे एनबीटीच्या पुस्तकांनाही मागणी वाढली आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये एनबीटीच्या पुस्तकांच्या विक्रीत, उलाढालीत अनेक पटींनी वाढ झाली आहे. विशेषतः लहान मुलांसाठी नव्या आशयाची मागणी वाढली आहे. बालसाहित्य हे नेहमीच प्रकाशन उद्योगाचा कणा राहिले आहे. मुलांची वाचनाची आवड निर्माण होण्यासाठीचा तो पायाभूत स्तर आहे. नवे वाचक घडण्याची शक्यता तिथूनच निर्माण होते.

## नाशिक जिल्ह्यात १५ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त

● नाशिक, सचिन कदम :



नाशिक ग्रामीण पोलिसांनी वणी आणि चांदवड परिसरात १५ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त केला. वणी गावातील के. आर. टी. महाविद्यालयासमोर वणी-सापुतारा रस्त्याने अवैधरित्या मद्याची वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचला. संशयित मोटार येताच तपासणी करुन देशी मद्याचा एक लाख, ६८ हजार ७०० रुपयांचा अवैध मद्यसाठा आणि वाहन असा तीन लाख, १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. साईनाथ जाधव (२५, रा. वागळूद) याला ताब्यात घेण्यात आले. अवैध मद्यसाठा त्याचा साथीदार किरण नागरे (रा. रामवाडी) याच्या दुकानातून भरल्याचे सांगितले. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दुसऱ्या घटनेत चांदवड पोलीस ठाणे हद्दीतील चांदवड-देवळा रस्त्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचत संशयित मोटारीची तपासणी केली. देशी मद्याचा २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत वाहन व अवैध मद्यसाठा असा १० लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



## मालेगावात शिक्षण मंत्र्यांनी घेतली विद्यार्थी अन् शिक्षकांची ‘शाळा’

● मालेगाव, सचिन कदम :

शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सोमवारी मालेगाव तालुक्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या विविध शाळांना अचानक भेटी देऊन तेथील विद्यार्थी व शिक्षकांची ‘शाळा’ घेतली. या भेटीत भुसे यांनी शैक्षणिक गुणवत्ता तसेच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आरोग्यविषयक बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर भुसे हे रविवारी पहिल्यांदाच मालेगावात दाखल झाले. त्यानंतर सोमवारपासून त्यांनी मतदारसंघाचा दौरा सुरू केला आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने भुसे यांनी काही शाळांना अचानक भेटी दिल्या.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची जाहीर माफी

● नागपूर, नितीन देवळेकर :

नागपूर विमानतळ रनवे रिकार्पेटिंगच्या कामात दिरंगाई होत आहे. यामुळे नागपूरातील प्रवाशांना अतिरिक्त विमान तिकिटाचे दर द्यावे लागतात. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कामाची पाहणी केली... तसेच यावेळी या कामामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल त्यांनी नागपूरच्या जनतेची जाहीर माफी मागितली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नागपूर विमानतळावरील धावपट्टीच्या दुरूस्तीच्या कामाची पाहणी केली. यावेळी एअरपोर्ट ऑथोरिटी आणि मिहान अधिकारी उपस्थित होते. मुंबई दिल्ली महामार्ग १३७० किमीचा एक लाख कोटींचा दोन वर्षांत केला आणि तीन किमीच्या रनवेसाठी दीड वर्षे कसे लागतात, हे हास्यास्पद आहे असेही गडकरी



यावेळी म्हणाले. २०२४ मे महिन्यात के जी गुप्ता कंपनीला रनवे रिकार्पेटिंगचं काम दिलं. रनवे रिकार्पेटिंगच्या कामामुळे विमान कंपन्यांनी शेड्युल बदलले, त्यामुळे विमान तिकिटांचेच दर वाढले . गेल्या अनेक दिवसांपासून विमानतळ धावपट्टीचे काम प्रलंबित आहे. नागपूरमधील उड्डान सेवांवर याचा परिणाम होत असून प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर धावपट्टीचे काम पूर्ण करण्याचे निर्देश गडकरीजी यांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी पत्रकारांशी बोलताना गडकरी म्हणाले, मी दिल्ली – मुंबई एक्स्प्रेस हायवे दोन वर्षांत पूर्ण केला.

## न्यू इंग्लिश स्कूल तुर्भेचा क्षेत्र भेट व वनभोजन कार्यक्रम संपन्न

● पोलादपूर , विशाल पाटील :



तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल तुर्भेचा क्षेत्र भेट व वनभोजन कार्यक्रम दिविल या गावी समाजसेवक शिवराम उतेकर व शिवराम गोळे यांच्या फॉर्म हाऊस वर संपन्न झाला. प्रथम गिर गाईंचे संगोपन व उपयोग याविषयी मंदार गोळे यांनी विस्तृत माहिती सांगितली. शीतगृह व सौरऊर्जा प्रकल्प, ठिबक सिंचन यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. नरेश शेलार यांच्या दूध केंद्र संकलन यास भेट विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिली. पोलादपूर तालुक्यातील विद्यार्थीप्रिय समाजसेवक शिवराम उतेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. फार्महाऊसवर भोजनासहित वडाच्या पारंब्यांवर लटकून, गाण्यांच्या भेंड्या खेळण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. आयोजित कार्यक्रमास उपस्थित समाजसेवक शिवराम उतेकर, शिवराम गोळे यांचा सत्कार करण्यात आला.

## मोटारचालकाची मुजोरी; उड्डाणपुलावर दुचाकीस्वार दाम्पत्याला धडक

### दाम्पत्याला मदत न करता मोटारचालक पसार

● पुणे, सुचिता देशमुख :

भरधाव मोटारीने दुचाकीस्वार दाम्पत्याला धडक दिल्याची घटना गुलटेकडीतील उड्डाणपुलावर घडली. अपघातानंतर जखमी झालेल्या दाम्पत्याला मदत न करता मोटारचालक पसार झाला. याप्रकरणी मोटारचालकाविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रकाश बाफना (वय ५८, रा. भूमीव्हिला सोसायटी, मार्केट यार्ड) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश बाफना, त्यांची पत्नी आणि मित्र सहकुटुंब शनिवारी (२१ डिसेंबर) रात्री टिळक रस्त्यावरील उपाहारगृहात गेले होते. तेथून बाफना दाम्पत्य दुचाकीवरुन रात्री साडेदहाच्या सुमारास घरी निघाले होते. गुलटेकडी ते मार्केट यार्ड दरम्यान असलेल्या उड्डाणपुलावर भरधाव मोटारीने दुचाकीस्वार बाफना यांना धडक दिली.बाफना दाम्पत्य रस्त्यात




पडले. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता, तसेच बाफना दाम्पत्याला मदत न करता मोटारचालक भरधाव वेगात पसार झाला.

अपघातानंतर बाफना दाम्पत्याला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बाफना यांना गंभीर दुखापत झाली. त्यांचे दोन्ही हात फ्रॅक्चर झाले. त्यांच्या पत्नीला गंभीर दुखापत झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या मोटारचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस नाईक विनोद धामणगावकर तपास करत आहेत.

## अंधेरीत नव्याने केलेल्या रस्त्यावर पुन्हा खोदकाम, पहिल्या टप्प्यातील रस्ते कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी रस्त्यांची कामे पुन्हा करण्याची वेळ

● मुंबई, यश सावंत :

अंधेरी पश्चिमेकडील लोखंडवाला परिसरात नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर पुन्हा एकदा कंत्राटदाराने खोदकाम सुरु केले आहे. काही महिन्यातच या रस्त्याच्या काही भागावर तडे पडले असून हा रस्ता नव्याने तयार करावा लागणार आहे. कोट्यवधी रुपयांची रस्ते कामांची कंत्राटे मिळवणाऱ्या कंत्राटदारांनी व गुणवत्ता देखरेख संस्थांनी कामात कुचराई केल्यामुळे परिसरातील नागरिकांना पुन्हा एकदा गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे.

मुंबई महापालिकेने हजारो कोटींची रस्ते कामे दोन टप्प्यात हाती घेतली आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील कामे सुरू असून या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळल्या आहेत. रस्त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी गुणवत्ता संस्थांची नेमणूक केलेली असतानाही अनेक ठिकाणी रस्त्यांवर तडे गेले आहेत तर काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग उखडला आहे. सांताक्रूझ येथील भार्गव मार्गावरही रस्त्यावर तडे गेले



आहेत. त्यातच आता अंधेरी लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन मार्गावरही त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे अंधेरीतील या मार्गावरील रस्त्याचा काही भाग उखडून तो पुन्हा नव्याने करण्याची वेळ आली आहे.

### कंत्राटदार, सल्लागार यांना दुप्पट दंड लावणार

■ रस्त्यांची कामे चांगल्या दर्जाची व्हावी याकरीता गुणवत्ता देखरेख संस्थांची नेमणूक केली आहे. तसेच या दोघांच्या कामावर अंकुश ठेवण्याची रस्ते विभागातील अभियंत्याचीही जबाबदारी आहे. मात्र या तिघांच्याही नजरेतून या त्रुटी सुटत असतील तर अक्षम्य बाब आहे. त्यामुळे जिथेजिथे रस्त्यांच्या कामाचा दर्जा नसेल तिथेतिथे कंत्राटदाराकडून पुन्हा काम करवून घेतले जाणार आहे. नागरिकांना पुन्हा पुन्हा गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्यामुळे दुरुस्तीच्या खर्चाच्या दुप्पट दंड कंत्राटदाराला व गुणवत्ता देखरेख संस्थेला लावण्यात येणार आहे. तसेच अभियंत्यांनाही नोटीसा बजावण्यात येणार आहेत.

-अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त